

# पाया रचिता




जगदिश खांदेवाले













मुखपृष्ठ ः शिरीष पिंगळे

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# पाया रचिता...

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# पाया रचिता...

लेखक

## जगदिश खांदेवाले

# पाया रचिता...

## लेखक... जगदिश खांदेवाले

फ्लॅट नं ११३ शिवशंकर सोसायटी.
शिवतीर्थ नगर कोथरुड पुणे ४११०३८
मो. नं ९१५८६६१६३८
Email id – jlkhandewale@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान


www. esahity. in
www. esahity. com
esahity@gmail. com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

**प्रकाशन : १० जून २०२१**



©esahity Pratishthan®202१

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे




उद्यमी, न्याय आणि अनाहुत या ई साहित्य प्रतिष्ठान तर्फे प्रकाशित झालेल्या माझ्या तीन कादंबऱ्यांना वाचकांनी उदंड प्रतिसाद दिल्याने मी ही चौथी कादंबरी सादर करीत आहे.

आपणास ही कादंबरी पण आवडेल अशी आशा करतो.

ई साहित्य प्रतिष्ठानचे श्री सुनील सामंत व त्यांचे सहकारी यांचे विशेष आभार.




**अर्पणपत्रिका**

माझे नातू

चि. ओजस (वय वर्षे अकरा)

आणि चि. विराज (वय वर्षे चार)

यांच्या सहकार्याशिवाय

मी एक शब्दही लिहू शकलो नसतो....

**कादंबरी विषयी थोडेसे**

स्वतःचा उद्योग सुरू करण्याऱ्या दोन धडपड्या तरुणांची तसेच त्यात त्यांना मनापासून साथ देण्याऱ्या त्यांच्या सहचारिणींची ही कथा आहे. उद्योजक आणि नोकरी करणाऱ्यांच्या मनोवृत्तीत स्वाभाविक फरक असतो. बहुतेक नवीन उद्योजक अनुभवासाठी सुरवातीला एकदोन वर्षे नोकरी करतात. त्यांचे अनुभव, त्याकडे बघण्याची त्यांची दृष्टी ही नक्कीच वेगळी असते. सर्वच गोष्टी आपल्या मनाप्रमाणे होतात असेही नाही. याउलट आहे त्या परिस्थितीत जे कोणी नवा मार्ग शोधतात ते निश्चित यशस्वी होतात. फार भव्य दिव्य यश नसतील मिळवत पण समाधानी असतात. याचा वेध घेण्याचा हा छोटासा प्रयत्न.

**<u>पाया रचिता...</u>**

**<u>लेखक : जगदिश खांदेवाले</u>**

या कादंबरीतील सर्व घटना, स्थळे व व्यक्ती काल्पनिक असून त्यांचा कोणाही व्यक्ती स्थळ वा घटनेशी साम्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग मानावा.

# प्रकरण १

राकेश हा माझा जिवलग मित्र. खरेतर आमच्या शाखा भिन्न होत्या; म्हणजे त्याची इलेक्ट्रिकल तर माझी मेकॅनिकल. सुरवातीला काही विषय समान असल्याने आमचे एकत्र पिरेड व्हायचे. त्यातून आमची ओळख आणि मैत्री झाली. ती इतकी घट्ट झाली की आम्ही दोघेही कॉलेजमधे दो चट्टाने म्हणूनच प्रसिद्ध झालो. तसे पाहिले तर आमचे स्वभाव, सवई, कौटुंबिक पार्श्वभूमी पुर्णतः भिन्न होत्या. मी मध्यम वर्गीय कुटुंबातील तर तो श्रीमंत. मी आईवडिलांच्या छत्रछायेत वाढलेला तर त्याचे आईवडील लहानपणीच गेलेले. तो होस्टेल आणि बोर्डिंगवर राहिलेला म्हणून बाहेर मोकळा वागायचा पण घरात संकोची.

दोघेही चांगल्या प्रकारे पास झालो तेव्हा एकाच ठिकाणी नोकरी करतील असा बऱ्याच जणांचा अंदाज होता. ते शक्यही होते पण राकेशने आपण दोन-तीन वर्षे तरी वेगवेगळया ठिकाणी नोकरी करू म्हणजे आपला अनुभव पण वेगळा राहील आणि ओळखी पण दुप्पट होतील असा पर्याय सुचविला. याला कारण थोडा अनुभव घेतला की व्यवसाय करायचा हे आमचे कधीचे ठरले होते. आता हे व्यवसायाचे भूत, तेही मराठी असूनपण, आमच्यात कसे

काय आले याला काही ठराविक उत्तर नाही पण आले हे खरे. खरेतर व्यवसायाची तोंडओळख आमची तशी नावापुरतीच होती पण इतर कोणापेक्षाही श्री नारायण मूर्ती, धीरूभाई अंबानी ही मंडळी आम्हाला जास्त प्रभावित करत होती हे खरे आहे. त्यात भर म्हणजे राकेशचे नोकरी म्हणजे गुलामगिरी हे तत्व शिवाय आपल्याजवळ गमावण्यासारखे काही नाही तर कशाला घाबरायचे हा युक्तिवाद.

एकूणच राकेश ठरवेल तसे मी वागत असे. त्यानुसार मी एका मध्यम (उद्यम इंजिनियरिंग) तर राकेश एका मोठ्या कंपनीत (आगम ऑटो )काम करू लागलो. अनुभव मिळविणे हा जरी मूळ हेतू असला तरी तो कोणाजवळ उघड करायचा नाही असे आम्ही ठरवले होते. तुलनेने बघितले तर माझी कंपनी जरी लहान असली तरी मला कामात जास्त स्वातंत्र्य होते. राकेशच्या कंपनीत मात्र नियम, उपनियम भरपूर होते आणि एकंदरित व्यापाच्या मानाने आवश्यक पण होते. त्याच्या कंपनीत नविन इंजिनियरला पहिल्या वर्षी सर्व महत्वाच्या विभागात एक दोन महिने काम करावे लागत असे. वर्षअखेरीस मूल्यमापन करून त्याचे पोस्टिंग ठरवत असत. राकेशचे वर्ष तर चांगले पार पडले होते आता फक्त शेवटचे दोन महिने राहिले होते. त्याचे काम आणि वर्तन चोख असल्याने तो सर्वांनाच हवासा वाटत होता. इंजिन विभागात त्याला एक सब-

असेंम्बली देण्यात आली होती. तेथे मशिन्स तर दहाच होती पण सातत्याने काम असल्याने ती देखभालीला मिळत नसत. परिणामी सतत तेल गळती होत असे. तात्पुरती डागडुजी आणि सतत स्वच्छता एवढेच काम शक्य होते. किंबहुना तेथील प्रमुख श्री सावंत, हाच विचार करून नविन उमेदवाराला हा विभाग मुद्दाम देत असत. सावंतसाहेब हे जरा वेगळेच रसायन होते. तसे ते काही फार सिनियर नव्हते पण सुरुवातीपासून एकाच ठिकाणी काम केल्याने त्यांची काहीशी मक्तेदारी झाली होती. कामाची त्यांना उत्तम माहिती होती यात काही शंकाच नव्हती पण त्यांना न विचारता कोणी काही बदल केला किंवा करण्याचा प्रयत्न केला तर तो त्यांना अजीबात सहन होत नसे. हे खालपासून वरपर्यंत सर्वांना ठाऊक होते. राकेश सोडून, कारण तो नवीनच आला होता. मुळात हे नवीन लोकांना रोटेशनमधे फिरविणे हे त्यांना मंजूर नव्हते. ते ट्रेनिजला passing clouds असेच संबोधित. तरी पण हा विभाग राकेशकडे सोपवितांना सावंतांनी त्याला स्पष्टपणे बजावले होते की जे चालू आहे ते आहे ते असेच चालू ठेव. येथे फार चमत्कार वगैरे करण्याचा प्रयत्न करू नकोस. समजल्यासारखे राकेश हो तर म्हणाला पण सेक्शन बघून तो हबकलाच होता कारण एकीकडे काम चालू होते तर दुसरीकडे साफसफाई. दिवसभर साफसफाई सुरू होती तरी जमीनीचा तेलकटपणा जसाचा तसा होता. यावर काहीतरी करावे

असे त्याला मनोमनी वाटत होते. अर्थात त्याने काही करावे ही कोणाची अपेक्षा नव्हती. असेच चार दिवस पार पडले. पाचव्या दिवशी त्याला सावंत साहेबांचा मेसेज आला की दुसऱ्या दिवशी व्हिजिट आहे तरी सेक्शन चकाचक करणे. आता इथे एक गोष्ट नमूद केले पाहिजे की खाजगी कंपनीत व्हिजिटला फार महत्व असते, व्यापारी दृष्टीने सुद्धा. बरेचदा भागीदारी करण्यापूर्वी किंवा मोठया ऑर्डर देण्याआधी एक शिष्टमंडळ कंपनीला भेट देऊन कंपनीची कार्यपध्दती, क्षमता समजून घेण्याचा प्रयत्न करते. शिष्टमंडळ विदेशी लोकांचे पण असू असते. या निमित्ताने स्वच्छता मोहीम जोरात राबवल्या जाते. जरी व्हिजिटचा मार्ग ठराविक महत्वाच्या विभागातून जात असला तरी स्वच्छता मात्र सगळीकडेच केली जाते कारण एखादा जाणकार व्हिजिटर जर विवक्षित विभाग दाखवा म्हणाला तर अति गोपनीय विभाग नसल्यास तो दाखविण्यात येतो. राकेशला याआधीच्या दोन व्हिजिट्सचा अनुभव असल्याने तो व्हिजिट महात्म्य जाणून होता. त्याने ताबडतोब चार हंगामी कामगार बोलावले आणि रेलिंग रंगवणे, पथ दर्शक पट्टे रंगवणे, डिस्प्ले बोर्ड स्वच्छ करणे सुरू केले. हे पूर्ण करण्यासाठी तो थोडावेळ जास्त थांबला. अर्थात यामुळे काम थांबले नव्हते. सर्व मनासारखे झाल्यावर तो निघणार तेवढ्यात अचानक प्लॅन्ट हेड भाटिया अचानक आले. सहसा

इतक्या उच्च पदावर असलेला अधिकाऱ्याबरोबर दोघा तिघांचा लवाजमा असतो पण आज नव्हता. बहुतेक बाकीचे व्हिजिटच्या तयारीत अडकले असावे. भाटिया हे अतिशय कार्यक्षम आणि तडफदार म्हणून प्रसिद्ध होते. ते आल्याबरोबर राकेश सामोरे गेला. त्यांनी पण बारकाईने सर्व विभागाचे निरीक्षण केले. खरे म्हणजे त्यांना खडानखडा माहिती होती. तीच त्यांनी राकेशकडून वदवून घेतली. राकेशला चांगली माहिती असल्याचे त्यांच्या सहज लक्षात आले आणि त्यांनी राकेशला सहज एक प्रश्न विचारला की हा विभाग आता दिसतो आहे तसाच कायम दिसण्यासाठी तू काही करू शकतो काय?

खरे म्हणजे हा एक सहज विचारलेला प्रश्न होता. काही अचूक उत्तर अपेक्षित नव्हते. पण राकेश ताबडतोब उत्तरला “मी बरेच काही करू शकतो पण मला दोन गोष्टी लागतील.”

“कोणत्या”भाटियांनी कुतूहलाने विचारले.

“150 मीटर पाईप, एक कॉम्प्रेसर, 12 प्रेशर गेज, एक कॉन्ट्रॅक्टर ही पहिली गोष्ट.”

“दिली समज आणि दुसरी गोष्ट?”

“काम करण्याचे स्वातंत्र्य!”

भाटियांना संदर्भ पटकन लक्षात आला व ते दिलखुलासपणे हसले आणि म्हणाले

“ते पण मिळाले समज. आता मला तुझा प्लॅन सांग पण मेहरबानी करून ते पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन पाठवू नको.”

यावर राकेश मनापासून हसला. त्याने वर असलेल्या हाय प्रेशर एअर लाईनकडे बोट दाखवले आणि म्हणाला

“ऑइल ऐवजी एअर वापरायची.”नंतर त्याने कागदावर लाईन कुठे व कशी घेता येईल तेही काम बंद न करता हे सांगितले. भाटियांनी खूप रस घेऊन काही शंका, सूचना दिल्या. राकेशनी पण तसे बदल केले. तेवढ्यात काही कामगार जेवण करून परत आले होते. साहेबांना सेक्शनमधे बघून त्यांना फार आश्चर्य वाटले. भाटियांनी त्यांच्याशी पण सहज संवाद साधला. कामगारांना पण यात सहभागी कर अशी सुचना देत ते जाण्यासाठी निघाले.

“उद्या व्हिजिट झाल्याबरोबर तुझ्याकडे कॉन्ट्रॅक्टर येईल. आज मंगळवार आहे. सोमवारी मला येथे एअरवर काम सुरू दिसले पाहिजे”ते म्हणाले आणि जाऊ लागले. तोच राकेश त्यांच्या मागे धावत गेला आणि त्याने विचारले “सर, दुसऱ्या गोष्टीचे काय?”

परत एकदा ते दिलखुलास हसले “त्याची काळजी तू करू नकोस. तुला कोणी विचारलेच तर मी हे करायला सांगितले आहे असे सांग.”

असे म्हणून ते तातडीने गेले पण. ते गेल्या बरोबर सर्व कामगार राकेशभोवती कुतूहलाने गोळा झाले व साहेब काय म्हणत होते असे विचारू लागले. राकेशने काही न लपवता त्यांना सगळे सांगितले. त्यांना पण राकेशची कल्पना आवडली. त्यांनी उत्स्फूर्तपणे काही सूचना केल्या. ज्या व्यवहार्य वाटल्या त्या राकेशने जरूर करू म्हणून सांगितल्या. पण सावंतसाहेब आपल्याला हे करू देतील काय ही शंका त्यांच्यातल्या एकाने काढताच आता राजानेच सांगीतल्यावर प्रधानजीला कशाला विचारायचे असे दुसऱ्याने परस्पर उत्तर देऊन त्याला गप्प केले. एकूण शॉपमधे गुप्त काही नसते असे मनाशी म्हणत राकेश घरी आला. दुसऱ्या दिवशी व्हिजिट झाल्याबरोबर सोराबजी कॉन्ट्रॅक्टर त्याची चार माणसे घेऊन राकेशला शोधत आला. त्याने काय करायचे ते नीट समजून घेतले. तो पण कामगारांशी बोलला आणि काम बंद न करता एअर लाईन कशी टाकता येईल यावर त्याची योजना त्याने मांडली. हे सर्व सुरु असतांनाच सावंत साहेबांचा एक मेसेज आला. दिल्लीला एका महत्त्वाच्या कॉन्फरन्सला जात असल्याने ते सोमवारपर्यंत येणार नव्हते. या काळात सर्वांनी श्री

रानडे यांना रिपोर्ट करावे अशी सुचना पण त्यांनी दिली होती. हा योगायोग नव्हे हे राकेशला त्या क्षणी पण जाणवले. आता त्याला तू काही काळजी करू नको असे भाटिया का म्हणाले ते त्याला कळले. स्वतःशीच किंचित हसून त्याने कामावर लक्ष केंद्रित केले. सर्व प्लॅन तयार होताच सोराबजी लगेच कामाला लागला. कामगारांचा उत्स्फूर्त सहभाग असल्याने काम दोन दिवसात पूर्ण झाले. काम सुरू करण्यापूर्वी त्याने सर्व योजना रानडे साहेबांना मेल केली. भाटिया साहेबांनी हे काम करण्यास सांगितले आहे हे लिहिण्याची खबरदारी त्याने घेतली. त्याशिवाय समक्ष भेटून त्याने पूर्ण आराखडा त्यांना दाखविला. रानडे साहेबांना त्यांची कामे भरपूर होती. त्यातूनही हे काम भाटिया साहेबांनी सांगितले आहे असे कळल्यावर आणि राकेश स्वतः जबाबदारी घेऊन काम करत आहे म्हटल्यावर ते कशाला नकार देतील? तरीपण सावंत साहेबांची एकंदर ख्याती त्यांना माहिती असल्याने त्यांनी तीच मेल सावंत साहेबांना पण फॉरवर्ड केली पण मेलबॉक्स फुल असल्याने मेल गेली नाही आणि मोबाईल आऊट ऑफ कव्हरेज एरिया होता.

इकडे शुक्रवारी काम पूर्ण होताच सोराबाजीने दोन माणसे मॉनिटरिंग करण्यासाठी ठेवली आणि ऑइल युनिट्स सुटे करून स्क्रॅप केली. झालेल्या बदलाने कामगार सर्वात जास्त आनंदी झाले होते. शुक्रवार आणि शनिवार दोन दिवस यशस्वीपणे लाईन

चालल्यावर त्यांनी स्वतःहून सेक्शनची फेररचना व रंगरंगोटी केली. आता सेक्शन खरच छान दिसत होता. आपण काहितरी करू शकलो याचे राकेशला पण समाधान वाटले. त्याचे हे समाधान सोमवारपर्यंतच टिकले. सावंत सोमवारी आले आणि आल्याबरोबर सर्वप्रथम राकेशच्या विभागात घुसले. विभागाचे बदललेले रूप बघून ते क्षणभर दचकले. तोच एका जुन्या कामगाराने त्यांना हाताला धरून सर्व बदल समजून सांगितला. सांगणारा कामगार असल्याने त्यांना काही बोलता पण येईना. नाईलाजाने वरकरणी ते हो का, छान छान असे म्हणत होते पण त्यांची नजर शोधत होती राकेशला. तोच काही कामाकरिता बाहेर गेलेला राकेश परत आला. त्याला बघताच सावंतांनी चालू संभाषण अर्धवटच सोडले व सरळ त्याच्या जवळ जात तूला मी काय सांगितले होते असे विचारले. हे असे होणार याची अपेक्षा असल्याने राकेशने शांतपणे विचारले, “कोठे, काय?”

“वेड घेऊन पेडगावला जाऊ नकोस. हा जो चेंज मला न विचारता तू केला आहेस त्याबद्दल मी बोलतोय.”सावंत चिडून ओरडले.

“अच्छा, तो होय. भाटिया साहेबांनी सांगितले म्हणून केले.”राकेश उत्तरला.

“मी तुला बजावले होते कोणताही बदल करायचा नाही म्हणून. तू तसे त्यांना का सांगितले नाही?”

“सर, मी एक साधा प्रोबेशनवर असलेला इंजिनियर आहे. मी कसा काय एवढया मोठया माणसाला नाही म्हणू शकतो? शिवाय मी मेल करून कळविले होते.”

“राकेश, मी दहा वर्षे नोकरी केली आहे. हे सर्व कसे घडले आहे ते मला कळते.”

राकेश स्वभावाने शांत असला तरी साधू-संत नक्कीच नव्हता. तो पण रागाने बोलला,”मला तुमचे बोलणे कळत नाही. हा बदल तुम्हाला नको असेल तर तुम्ही तसे सांगा. मी ऑइल सिस्टीम परत लावतो.”

यावर काय बोलावे हे सावंत साहेबांना सुचले नाही. भाटियाचा निर्णय फिरवायची त्यांची हिम्मत नव्हती. राकेश इतका खमक्या असेल असेही त्यांना वाटले नव्हते. काही नको, हे तुला भारी पडेल असे बडबडत ते निघून गेले.

कामगार दुरुन हा प्रकार निरखीत होते. त्यांची सहानुभूती अर्थातच राकेशच्या बाजूने होती. वरिष्ठांच्या वादात आपण कशाला पडायचे या विचाराने ते बोलत नव्हते एवढेच. त्यामुळे सावंतसाहेब जाताच त्यातील दोघे राकेशकडे आले आणि साहेब

तुम्ही काही काळजी करू नका, वेळ पडल्यास आम्ही तुमच्या बाजूने बोलू असे सांगू लागले. भाटियांचा पाठिंबा असल्याने पुढे काहीही होणार नाही याची राकेशला खात्री होती. त्यामुळे ही किरकोळ बाब आहे. तुम्ही लक्ष देऊ नका. तसेही या आठवड्या नंतर माझे दुसऱ्या सेक्शनला पोस्टिंग होणार आहे असे राकेश त्यांना म्हणाला. त्यावर लय भारी म्हणत ते गेले.

झालेही तसेच राकेश दुसरीकडे गेल्यावर सावंतसाहेब बरेच शांत झाले. राकेश तर केव्हाच ही घटना विसरून नवीन सेक्शनमध्ये जोराने कामाला लागला होता. त्याला नेहमी नवी कामे, आव्हाने आवडत. असे एकाच प्रसंगात घुटमळत बसणे त्याच्या स्वभावात नव्हते.

इतर ठिकाणी त्याला असा अनुभव परत कधीच आला नाही. उलट सततच्या चाकोरीबद्ध कामाने आम्हाला नवीन काही सुचत नाही, तुझे तसे नसल्याने तू जरुर काही नवीन सुचल्यास सांग. करण्यासारखे असल्यास आपण ते जरूर करू असे सांगणारे वरिष्ठ भेटले.

---------------*----------------

# प्रकरण २

एकंदरीत सर्व सुरळीत चालू आहे असे वाटत असतांनाच राकेश जेथे काम करीत होता तिथेच एक नविन प्रश्न उदभवला. त्याचे झाले असे की कंपनीला वेल्डिंग रॉड पुरवणारे दोन प्रमुख पुरवठादार, दीपक आणि सुरज हे होते. त्यांचा माल अगदी समान दर्जाचा होता. दोन्ही कंपन्या समान पुरवठा करीत. अचानक सूरज कंपनीत काही अडचण आल्याने त्यांचा पुरवठा कमी झाला. अर्थात अशा गोष्टी गृहीत धरल्या असतात त्यामुळे दीपक कंपनीचा पुरवठा त्याप्रमाणात वाढविण्यात आला. खरे म्हणजे ही एक क्षुल्लक बाब होती पण कंपनीच्या कामगार संघटनेच्या निवडणुका जवळ आल्या होत्या. जे नवीन लोक इच्छूक होते त्यांच्या दृष्टीने ही एक चांगलीच बाब होती. या निमित्ताने त्यांनी चांगलेच रान उठवले. त्यांनी एकच मुद्दा लावून धरला की दीपक कंपनीचे रॉड जास्त धूर निर्माण करतात, त्यामुळे आमच्या आरोग्यावर परिणाम होतो. खरे म्हणजे या आरोपात काही तथ्य नाही हे त्यांनापण माहिती होते पण आरोग्याचा प्रश्न म्हटला की कोणीच प्रतिवाद करत नाही हे ते जाणून होते. विद्यमान संघटनेच्या नेत्यांनी सुरवातीला प्रतिवाद जरूर केला. कामगारांमध्ये काहीजणांच्या

दृष्टीने काम टाळण्यासाठी ही पर्वणीच होती त्यामुळे त्यांनी जोरात कांगावा सुरू केला. तसे निम्मे कामगार कुंपणावर होते. बघता बघता हे लोण राकेशच्या विभागात पसरले इतके की एक दिवस सकाळीच कामगार राकेशला सांगू लागले की सध्याचे रॉड फारतर अकरा वाजेपर्यंत पुरतील नंतर जर सुरजचे रॉड मिळाले नाहीत तर आम्ही काम करणार नाही.

राकेशने स्टोअर्सला विचारले तर त्यांनी असमर्थता व्यक्त केली. त्याने त्याच्या वरिष्ठांना तसे ताबडतोब कळविले. भरूचा हे त्याचे वरिष्ठ, फारच शांत आणि अचूक निर्णय घेण्यासाठी प्रसिध्द होते. त्यांनी राकेशला त्वरित केबिनमध्ये बोलावले. राकेश येताच त्यांनी त्याला बसण्याची खूण केली. सर्व प्रकार आधीच राकेशने फोनवर सांगितला होता त्यामुळे परत नवीन काय सांगायचे म्हणून राकेश गप्पच होता तोच भरूचा

स्वतःहुनच म्हणाले, “मी जोशींची वाट बघत आहे.”

राकेशने प्रश्नार्थक मुद्रेने त्यांच्याकडे बघितले.

“अरे हो, तुला जोशी माहिती नसतील. हे आपल्या कंपनीचे वेल्डिंग कन्सल्टंट आहेत. आपल्या जवळपास सर्वच कामगारांना त्यांनी प्रशिक्षण दिले आहे. कामगार त्यांना खूप मानतात.”

तेवढ्यात दुरून आरडाओरडा ऐकू आला. कोणीतरी चहावाल्यावर ओरडत असल्याचे ऐकू आले. काय रे हा चहा आहे की गरम पाणी? दूध, साखर काय नुसते दुरून दाखवता काय असे म्हणत एक पन्नाशीच्या दरम्यानचा गृहस्थ चहावाल्या समवेत केबिनमध्ये आला. कोणी न सांगताही हेच जोशी हे राकेशला कळले. गव्हाळी वर्ण, पावणे सहा फुटापर्यंतची उंची, साधे कपडे, किंचित स्थूल शरिरयष्टी, बारीक कापलेले केस, कपाळावर दुबोटी गंध, सतत चालणारा तोंडाचा दाणपट्टा पण त्याचवेळी चेहऱ्यावर मिस्कील हास्य असे हे व्यक्तिमत्त्व होते. ते ऐवढे ओरडत होते तरी इतर वेळी सर्वांवर खेकसणारा चहावाला चक्क हसत होता. त्यानी जोशींना हाताला धरुन खुर्चीत बसवले. समोर गरम गरम चहा ठेवला. दुसरी डिश समोर ठेवली. खिशातून क्रीम बिस्किटाचा पुडा काढून डिश मध्ये ठेवला आणि आता जरा निवांतपणे चहा घ्या असे म्हणाला.

भरूचा शांतपणे हा सर्व प्रकार बघत होते. जेंव्हा चहावाल्याने बिस्किटे डिशमध्ये ठेवली तेंव्हा मात्र ते मुद्दाम खवचटपणे चहावाल्याला उद्देशून म्हणाले की मी मघाशी तुला बिस्किटे मागितली तेंव्हा तू संपली म्हणून सांगितले होते. आता जोशीबुवा

साठी मात्र लगेच काढून दिली हे कसे काय? त्यावर तो पण निर्विकारपणे बुवा व्हीआयपी आहे असे म्हणाला.

एकंदरीत तिघांच्याही संभाषणावरून आणि देहबोलीवरून तिघांचाही बराच परिचय असावा हे जाणवत होते. पण त्यातही राकेशला विशेष जाणवली ती जोशींची निरागसता. ते निवांतपणे बिस्किटे खात होते आणि आपल्याबद्दलच काही बोलले जात आहे याची दखल पण घेत नव्हते. शेवटचे बिस्कीट खाल्ल्यानंतर ते भरूचाकडे बघत म्हणाले, “काय रे बावा, तू कधी अतिथी देवो भव: ऐकले नाही काय? बर ते जाऊ दे. आता कामाचे बोल.”

इतका वेळ हलकेफुलके भासणारे वातावरण आता गंभीर झाले. भरुचांनी राकेशची ओळख करून दिली. राकेशने सर्व प्रकरण विस्ताराने सांगितले. जोशींनी तू स्वतः वेल्डिंग करून बघितले आहे काय असे विचारले.

त्यावर राकेशने शांतपणे मी रोज साधारणपणे अर्धा तास वेल्डिंग करतो आणि मला तरी धूर जास्त येत आहे असे जाणवले नाही हे ठामपणे सांगितले. यावर काही न बोलता जोशींनी भरुचांकडे बघितले व म्हणाले, “मला लाईनवर जाऊन बघायला हवे.”

“आता त्यांची जेवणाची वेळ झाली आहे. अकरा वाजता काम परत सुरू होईल.”राकेश म्हणाला.

“मग लवकर चल. अकराच्या आत आपल्याला बरेच काम उरकायचे आहे. ऐ बावा, भाटिया बरोबर बारा वाजता लाईनवर येतील ऐवढे बघ.”असे म्हणत उत्तराकडे लक्ष न देत ते सरळ लाईनवर निघाले. लाईन अपेक्षेप्रमाणे मोकळी होती कारण सर्व कामगार जेवायला गेले होते.

“लाईनवर सुरजचे रॉड कोण वापरतो आणि दीपकचे कोण?"

“डावीकडे सगळे सुरज वापरतात आणि उजवीकडे दीपक.”राकेशने माहिती पुरवली.

"रॉड पॅकिंगमधून काढल्यावर ओळखण्यासाठी काही वेगळी खूण वगैरे केली जाते?"

“नाही.”

“म्हणजे आपण आत्ता अदलाबदल केली तर कोणाच्या लक्षात येणार नाही. बरोबर?"

"बरोबर.”

तेव्हढ्यात त्यांचे लक्ष लाईनवरच्या सीसीटीव्हीकडे गेले.

"हे सर्व सीसीटीव्ही चालू कर. आपले काम रेकॉर्ड झाले पाहिजे.”

राकेशने त्याप्रमाणे केले. नंतर दोघांनी रॉड्सची अदलाबदल केली. जोशींनी आपले सर्व काम व्यवस्थित शूट झाले आहे की नाही हे दोन वेळा चेक केले. तेव्हाच राकेशला जाणवले की हा माणूस बोलण्यात अघळपघळ असला तरी कामात काटेकोर आहे. सर्व त्यांच्या मनासारखे झाल्यावर ते राकेशला म्हणाले, “आता खरा खेळ सुरू. तू फक्त लोक आल्यावर मी काय प्रॉब्लेम आहे हे बघण्यासाठी आलो आहे एव्हढेच सांग.”

पण राकेशला ते सांगण्याची गरज पडली नाही कारण एव्हाना जेवण आटपून कामगार परत येऊ लागले होते आणि जोशींना बघून उत्स्फूर्तपणे त्यांच्याभोवती जमा होऊ लागले होते. त्यातले बरेचसे त्यांच्या ओळखीचे होतेच. अगदी मोकळेपणे ते सर्वांशी बोलत होते. कोणाच्या पाठीत धपाटा घाल, कोणाला टपली मार, कोणाच्या घरची, मुलांची खुशाली विचार असे अगदी सहजपणे सुरू होते. ज्या गोष्टी इतर कोणी केल्या असत्या तर कामगार चिडले असते त्या बुवा निरागसपणे करीत होते. हे कामगारांना पण जाणवत असावे त्यामुळे ते दिलखुलासपणे हसून दाद देत होते. अपेक्षेप्रमाणे कोणीतरी रॉडस् संबंधी तक्रार करताच जोशींनी पटकन जाहीर केले

मी तेच बघायला आलो आहे पण तुमचा माझ्यावर विश्वास आहे काय?

यावर सर्वांनी एकमुखाने होकार दिला. ताबडतोब जोशींनी घड्याळ बघितले आणि बरोबर सव्वा अकरा वाजता काम सुरू करा आणि बारा वाजता थांबवा असे सांगितले. काम करतांना जर कोणालाही प्रॉब्लेम आला मला सांगा हे पण बजावले. एक जुना कामगार मधुकर, जोशींचा विशेष आवडता दिसत होता. त्याला उद्देशून ते मुद्दाम मोठ्याने म्हणाले, "काय मध्या, जमेल का पाऊण तास वेल्डिंग की पेट्रोल लागेल?"

सर्वांना हा पेट्रोलचा संदर्भ बरोबर कळला. हसतच सर्वांनी काम सुरू केले. जोशींनी राकेशला एक्सझॉस्ट आणि ब्लोअर्स फुल स्पीडवर चालू करण्यास सांगितले. त्याचप्रमाणे सीसीटीव्ही पण चालू आहेत काय याची खात्री करण्यास सांगितले. हा माणूस बारीकसारीक तपशील पण विसरत नाही असे मनाशी म्हणत राकेशने सर्व चेक केले आणि काम जोरात सुरु झाले. सुरवातीला पंधरा मिनिटे सर्व ठीक चालू होते नंतर अपेक्षेप्रमाणे उजव्या बाजूने एकाने आवाज देऊन जोशींना बोलावले. तो नेहमी तक्रार करणाराच होता. ते जवळ जाताच तो म्हणाला, "तुम्हीच बघा सर किती धूर येत आहे."

जोशींनी काही न बोलता त्याला हाताला धरून उठवले आणि मीटिंग पॉईंटला जाऊन बस म्हणून सांगितले.

परत दहा मिनिटांनी दुसऱ्याने पण तीच तक्रार केली. हा पण उजव्या बाजूचाच होता आणि नेहमीचा तक्रारखोर होता. त्याला पण जोशींनी पहिल्या जवळ जाऊन बसायला सांगितले. नंतर मात्र कोणाचीही तक्रार आली नाही. जोशी प्रत्येकाच्या जवळ जाऊन कोणाचे सेटिंग चेक कर, कोणाचा वेल्डिंगचा कोन बदल, पोश्चरमधे किंचित सुधारणा कर अशी कामे करत होते. त्यावरूनच त्यांचे प्रभुत्व लक्षात येत होते. कामगार पण त्यांना पूर्ण सहकार्य करीत होते.

बरोबर बारा वाजता जोशींनी काम थांबवले आणि सर्वांना मिटींग पॉईंटला एकत्र केले.

“शिर्के आणि सकपाळ हे दोघे सोडल्यास बाकी कोणालाही धुराचा त्रास झाला नाही”जोशी म्हणाले.

“ते पण दीपकचे रॉड वापरले म्हणून.”शिर्के म्हणाला आणि सकपाळने दुजोरा दिला.

यावर काही न बोलता जोशींनी राकेशला साडेदहा वाजल्यापासूनचे फुटेज दाखव असे सांगितले. फुटेजमधे राकेश

आणि जोशींना रॉडस् बदलतांना बघताच शिर्के आणि सकपाळ यांचे चेहरे पडले.

"मी काही बोलायची गरज आहे असे मला वाटत नाही."

जोशी विषादाने त्यांच्याकडे बघत म्हणाले.’’मी माझ्या विद्यार्थ्यांना असे तर कधीच शिकवले नाही."

दोघेही कामगार खाली मान घालून उभे होते. आता शिक्षक आणि चुकलेले विद्यार्थी यांच्यात जे एक विशिष्ट नाते असते ते निर्माण झाल्याचे राकेशला सहज जाणवले. तेवढ्यात मधूने जाऊ द्या सर, होते असे कधी कधी असे म्हणून वातावरणातील ताण जरा कमी करण्याचा प्रयत्न केला शिवाय लहान आहेत अजून अशी मखलाशी पण केली त्यासरशी जोशींचा मूळ स्वभाव परत उफाळून आला.

‘‘लहान? अरे वेळेवर लग्न झाली असती तर एव्हाना बाप झाले असते.’’ते मोठ्याने म्हणाले.

‘‘ते बाप केव्हाच झाले आहेत.’’इती मधोबा.

‘‘होय काय रे चोरांनो?"

दोघांनी कसंबसं हसत माना हलवल्या.

“मग तर तुम्ही जास्त जबाबदारीने काम केले पाहिजे"मान हलवत जोशी म्हणाले “एक लक्षात ठेवा. जोपर्यंत काम तुम्हाला शोधते तोपर्यंत ठीक असते पण उद्या जर उलट झाले म्हणजे तुम्हाला काम शोधायला लागले तर परिस्थिती कठीण होईल. कळले? जावा आता. परत असे करू नका.”जोशी म्हणाले.

त्यावर त्यांनी पण परत असे होणार नाही अशी ग्वाही दिली.

लगेच मधू आणि दोन तीन जुन्या लोकांनी ' पुंडलिक वरदा हरी विठ्ठल' असा घोष केला.

आता राकेशचे लक्ष मागे गेले तर भाटिया, भरूचा केव्हाच मागे येऊन उभे राहिले होते. त्यानी हळूच जोशींना तसे सांगितले. एव्हढा आरडाओरडा ऐकून भाटिया नक्कीच रागावतील असे त्याला वाटले. पण त्यानी जोशींना पूर्ण ओळखले नव्हते असेच म्हणावे लागेल कारण त्याने सांगितल्यावर जोशींची पहिली प्रतिक्रिया म्हणजे केंव्हा आली भची बाराखडी अशीच होती. हे पण भाटिया यांनी पूर्णपणे ऐकले होते.

“तुझे कीर्तन चालू होते तेंव्हाच आली”ते मिस्कील पणे राकेश काही बोलायच्या आत म्हणाले.”काय म्हणतात तुझे लाडके विद्यार्थी?”

“त्यांना त्यांची चूक कळली आहे पण आता त्यांच्यावर काही कारवाई वगैरे करू नको.”जोशी मोठ्याने म्हणाले.

मागे रेंगाळत असलेल्या काही कामगारांनी ते वाक्य ऐकलेच किंबहुना त्यांनी ऐकावेच असा जोशींचा उद्देश असावा. अशा किरकोळ गोष्टी भाटियांना नवीन नव्हत्या. त्यामुळे त्यांनी पण ठीक आहे तू म्हणतो तसेच होईल असे म्हणून विषय संपवला.

यानंतर मात्र कोणतीही विशेष घटना न होता राकेशचे प्रोबेशन संपले.

एक दिवस राकेशच्या साहेबांना (म्हणजे त्यावेळी तो ज्या विभागात काम करित होता त्या) श्री गुप्ता यांना, एच आर मधून फोन आला की राकेशला साडेचार वाजता लेटर घेण्यासाठी पाठवा. गुप्ता हे फार उमदे अधिकारी होते. त्यांनी ताबडतोब राकेशला निरोप दिला आणि त्याचबरोबर त्याचे अभिनंदन सुध्दा केले. राकेशचा आतापर्यंतचा रेकॉर्ड बघता नेमणूक पत्र घेणे ही केवळ एक औपचारिकता होती. पार्टीला बोलवायला विसरू नको असे बजावयाला ते विसरले नाहीत. “काय सर तुम्हीपण…” असे म्हणत राकेश साडेचार वाजता एच आर ऑफिसमध्ये पोचला.

तेथे पोचताच त्याला ताबडतोब जोशी साहेबांनी केबिनमध्ये बोलावले. तेथे जोशीं बरोबर सावंत बसलेले बघून त्याला जरा आश्चर्य वाटले. असेल कंपनीची प्रथा असे त्याला वाटले.

“ये राकेश”जोशींनी स्वागत केले. थोडे औपचारिक बोलणे झाल्यावर त्यांनी फाइल मधून एक लेटर काढले आणि सावंतांकडे देत म्हणाले,”तुम्हीच सांगा.”

घसा खाकरित सावंतांनी लेटर घेतले आणि म्हणाले,”Raakesh, We regret to inform you that we do not need your services with immediate effect.”

राकेशचा क्षणभर कानांवर विश्वास बसेना. तरीपण स्वतःला कसेबसे सावरून त्याने शांतपणे विचारले, “May I know why?”

“जरूर, प्रोबेशन दरम्यान असे लक्षात आले आहे की तू वरिष्ठांची अवज्ञा करतोस किंबहुना तशी तुला सवयच आहे आणि Insubordination in any form is not acceptable in this company.”सावंत ठामपणे उत्तरले.

काही न सांगताच राकेशला सर्व संगती लागली आणि सावंताच्या उपस्थितीचे कारण पण कळले. त्याने पटकन निर्णय घेतला आणि सावंत पुढे काही However if you tender

apologies असे काही बडबडत असतांनाच हात वर करून त्यांना थांबवले आणि शांतपणे म्हणाला,"Letter please."

सावंत आणि जोशी या दोघांनाही ही प्रतिक्रिया अनपेक्षित होती. आपल्या दरडावण्याला राकेश घाबरून गयावया करेल मग आपण उपकार केल्यासारखे दोन दिवसांनी लेटर बदलून देऊ असेच त्यांनी गृहीत धरले होते. राकेशच्या या पवित्र्याने ते गडबडले.

"म्हणजे तू, तुला."ते कसेबसे म्हणाले.

"मलाच इथे काम करण्याची इच्छा नाही."

जोशींनी सहेतुक पणे सावंत साहेबांच्याकडे बघितले आणि लेटर स्वतःकडे घेतले.

परत एकदा नीट वाचून ते राकेशला देत म्हणाले, "नीट विचार करून निर्णय घे."

"सर, जिथे कामापेक्षा अहंकार मोठा असतो तिथे न राहिलेले बरे."असे म्हणत किंचित हसून राकेशने त्यावर सही केली आणि त्यांची कॉपी परत केली.

खरे म्हणजे इथेच प्रकरण संपले होते पण राकेशला आपण इथेही नमवू शकलो नाही हे जाणवून सावंत संतापाने बेभान झाले

आणि तसेच रागाने उठले. त्यांनी केबिनचे दार अर्धवट उघडुन धरले आणि तेथूनच जोराने ओरडून म्हणाले, “This way out.”

त्यांच्या या अनपेक्षित आणि अनावश्यक कृतीने राकेशचा आतापर्यंतचा कोंडून ठेवलेला संताप उफाळून आला. तिरिमिरीने उठून तो दरवाज्या जवळ गेला. सावंत साहेबांच्या समोर उभे राहून आणि नजरेला नजर देत तो म्हणाला “सावंतसाहेब, आजची वेळ, तारीख आणि तुमचे शब्द लक्षात ठेवा. एक ना एक दिवस मी याची परतफेड करिन.”

असे म्हणून तो मागे वळून न बघता सरळ कंपनीच्या बाहेर गेला.

---------------*----------------

## प्रकरण ३

संध्याकाळी जेव्हा मी त्याला भेटलो तेव्हा तो पूर्णपणे शांत झाला होता. उलट झाले ते एका परीने बरेच झाले असे तो म्हणाला. मी पण नोकरी सोडतो असे मी म्हणताच त्याने माझ्या कंपनीचे अग्रीमेंट सहा महिन्यांनी होणार आहे, ते झाल्यावर सोड असाही सल्ला त्याने दिला. या मधल्या वेळात त्याने मार्केट सर्व्हे, बांधकाम, कंपनी करता लागणारे परवाने यावर काम करावे यावर आमचे एकमत झाले. तसेच यानंतर या विषयावर परत चर्चा करायची नाही हे ठरवून आम्ही राकेशचा स्वातंत्रदिन साजरा केला. नोकरी सुटल्यावर पार्टी करणारे बहुदा आम्ही दोघेच असू. परत हा विषय कधीही काढायचा नाही असे ठरवूनच आम्ही घरी जाण्यासाठी निघालो.

हॉटेलबाहेर येताच मोकळ्या हवेत आम्हाला अधिकच छान वाटले. खाणेपिणे जरा तब्येतीतच झाल्याने राकेशने मला त्याच्याकडेच मुक्काम करण्यास सांगितले. मी राकेशकडे जात आहे असे मी घरी आधीच सांगितले असल्याने ते माझी वाट

बघणार नव्हतेच म्हणून मी पण होकार दिला. त्याचे घर जवळच असल्याने आम्ही पायीच जायचे ठरवले आणि चालू लागलो.

तशी दिवसाची गर्दी केव्हाच ओसरली होती. रहदारी पण कमी झाली होती. फुटपाथवरील किरकोळ विक्रेते त्यांचा पसारा आवरत होते. तेवढ्यात मला फुटपाथवर पथारी मांडून बसलेला एक ज्योतिषी दिसला. तो साधारणपणे साठीच्या आसपास असावा. सफेत कुडता, सफेत धोतर, सफेत पागोटे, खुरटी दाढी, झुबकेदार मिशा, सावळा वर्ण, कपाळावर दुबोटी गंध अशी व्यक्ती अगदी शांतपणे इमर्जन्सी लॅम्पच्या प्रकाशात पंचांग वाचीत बसली होती. इतरांप्रमाणे त्याचा पसारा काही जास्त नसल्याने असेल कदाचित पण त्याला काही घाई दिसत नव्हती. मी राकेशला त्याच्याकडे बोट दाखवून म्हणालो, “अरे तो बघितला काय, कोण आहे?"

राकेशने नीट न्याहाळून बघितले आणि मला म्हणाला, "ज्योतिषी दिसतोय पण कमाल आहे इतके दिवस मला कधीही दिसला नाही.”

“तुझे लक्ष नसेल. चल आपण भविष्य बघू.”

“काहीतरीच काय, मला माहिती आहे की तुझापण ज्योतिष्यावर विश्वास नाही. कशाला उगाच गरिबाची चेष्टा करायची.”

“अरे चेष्टा म्हणून नाही पण आज सर्वच दृष्टीने खास दिवस आहे म्हणून विश्वास असो वा नसो बघूया काय आहे नशीब. निदान थोडी सावधगिरी तरी बाळगता येईल.”

"ठीक आहे”असे म्हणत किंचित नाराजीनेच राकेशने होकार दिला आणि आम्ही दोघेही ज्योतिष्यासमोर स्थानापन्न झालो. ज्योतिषाने आमच्याकडे एकदा नजर टाकली, पंचांग बाजूला ठेवून तो आमच्याकडे स्थिर नजरेने बघत म्हणाला, "काय रे बाबांनो, बराच उशीर केला यायला. म्हटलं येताय की नाही?"

आम्ही दोघांनी एकमेकांकडे सहेतुक पणे बघितले. साधारण पणे सर्व ज्योतिषी उत्तम तार्किक, उपदेशक आणि संभाषणकुशल असतात त्याप्रमाणे हा पण आहे असा त्यातला गर्भितार्थ होता.

“आमचे भविष्य सांगा पण अगोदर तुमची दक्षिणा सांगा”राकेश सरळ मुद्द्यावर आला.

“मी पोटार्थी ज्योतिषी नाही. मला आज्ञा झाली तरच मी भविष्य सांगतो, "

परत आम्ही एकमेकांकडे बघितले. अजून एक व्यापारी कौशल्य!.

“आणि आमचे भविष्य सांगा अशी तुम्हाला आज्ञा झाली.”मी म्हणालो.

त्याने होकारार्थी मान हलविली.

“आता तुम्ही आमच्या भूतकाळातील एकदोन घटना सांगाल, जसे लहानपणी खूप मोठया संकटातून वाचलो वगैरे नंतर मोघम भविष्य खरे ना?”मी आगाऊपणे बोलताच राकेशने माझ्याकडे रोखून बघितले.

“आपले काय ठरले होते?”तो रागावून म्हणाला.

“त्या पेटुरामकडे काही लक्ष देऊ नको.”ज्योतिषी शांतपणे म्हणाला आणि एक कागद आमच्याकडे देत यावर तुमची नावे आणि जन्मतारीख लिहा असे त्याने सांगितले.

“अहो आम्हाला पत्रिका नको आहे, “राकेश कागद घेत म्हणाला.

“पत्रिकेसाठी नाही, तुम्ही कळण्याच्या अवस्थेत आहे की नाही हे बघण्यासाठी लिहा म्हणतो.”

यावर काही वाद न घालता आम्ही त्याच्या सांगण्याप्रमाणे केले. त्याने तो कागद निरखुन बघितला आणि बोलण्यास सुरवात केली.

“मी तुम्हाला ग्रह, नक्षत्र आणि ताऱ्यांच्या जंजाळात न गुंतवता एवढेच सांगतो की जे तुमच्या मनात आहे तसे होणार नाही पण जे तुम्ही कराल त्यात तुम्हाला भरघोस यश मिळणार हे नक्की.”

“म्हणजे?”राकेशने विचारले.

“शंका नंतर.”तो म्हणाला, “काय करायचे हे तुम्हाला एक अनुभवी माणूस सांगेल. फक्त तुम्ही त्याला ओळखले पाहिजे.”

“महाराज जरा समजेल अशा भाषेत सांगा.”मी म्हणालो.

“हे काम तुझ्याच हातून होईल आणि तुझा मित्र पूर्ण करेल.”तो हसून म्हणाला, “या कामात तुमच्या बायकांचा मोठा सहभाग असणार आहे. नियम एकच, कोणताही निर्णय चौघांनी मिळून घ्यायचा.”

“महाराज, इथे मात्र तूम्ही चुकला.”राकेश म्हणाला, “आमची लग्नेच झाली नाहीत आणि अजून तरी विचार नाही.”

“ते सोडा येत्या पाच महिन्यात तुमची लग्ने होतील. नाही. काही बोलू नकोस. मी बरोबर सांगितले आहे.”तो म्हणाला.

आम्ही दोघेही जरा चकित होऊन त्याच्याकडे बघत होतो

आणि तो हलकेच 'अंतरीचा ज्ञानदीवा मालवू नको रे ' असे म्हणत आवरासावर करीत होता. पडशी भरताच त्याने ती पाठीशी घेतली आणि तो आम्हाला येतो असे म्हणाला. त्यासरशी राकेशने घाईने पाचशेची नोट काढून त्याचकडे दिली आणि म्हणाला, "महाराज, तुमची दक्षिणा."

हातानेच ती मागे सारीत तो म्हणाला, "भविष्य खरे झाल्यावर द्या."

"असे कसे महाराज, तुम्ही परत कुठे आणि कशावरून भेटाल?"राकेश निग्रहाने म्हणाला.

"मी नसलो तरी दुसरा कोणी माझी प्रचिती देईल. ओळखण्यासाठी फक्त अंतरीचा ज्ञानदिवा मालवू नको रे "असे म्हणत आणि परत आम्हाला कोड्यात पाडून तीच ओळ गुणगुणत तो चालू लागला. त्याची चाल इतकी झपाट्याने होती की क्षणात त्याची पाठमोरी आकृती दिसेनाशी झाली.

झाल्या प्रकाराने आम्ही जरा बधिरच झालो होतो. तेवढ्यात एक मारुती कार आमच्याजवळ येऊन थांबली.

"ओ बादशाओ, की गल है? रास्ता भूल गये हो क्या? कही छोड दू?"गाडीतूनच एक सरदारजी ओरडून म्हणाला.

हे ऐकताच आम्ही भानावर आलो. काही नाही, आम्ही जवळच राहतो असे आम्ही त्याला सांगताच तो कुछ हो तो बोलो, शर्मांना नही म्हणत तो गेला. नंतर काही न बोलता आम्ही सरळ राकेशच्या घरी गेलो आणि ताणून दिली.

---------------*----------------

# प्रकरण ४

दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर मला तर काही विशेष आठवत नव्हते पण राकेश उर्फ मिस्टर परफेक्शनिस्ट काही विसरायला तयार नव्हता. त्याने झालेला सर्व प्रकार साद्यंत लिहून काढला व मला मेल केला. कामाच्या रगाड्यात आम्ही तो प्रकार विसरून गेलो. राकेश ठरल्याप्रमाणे कंपनी उभारण्यासाठी लागणारे परवाने, जागेची आखणी, बँकेची कामे यात गर्क झाला, मी माझ्या नोकरीत. माझ्या कंपनीत पण वेतन कराराचे वारे वाहू लागले होते. मध्यम कंपनी असल्याने मालक ठरवेल तेच होणार हे गृहित होते तरीपण काही ताण तणाव असतातच.

त्यातच माझ्या बाबतीत एक मजेदार घटना घडली. माझ्या कंपनीचे बऱ्याच ठिकाणी वार्षिक देखभालीचे करार होते कारण हिटिंग सिस्टिम हा आमचा मोनोपली बिझिनेस होता आणि त्या करिता लागणारा विशेष परवाना आमच्याकडे होता. या सर्व करारांचे दरवर्षी नूतनीकरण करणे कायद्याने आवश्यक होते. कच्च्या मालाची भाववाढ, वेतनवाढ, नफा वगैरे बाबी गृहीत धरून दरवर्षी साधारणपणे आठ ते दहा टक्के अशी या करारांची किंमत वाढत असे. सुरक्षितेचा मुद्दा असल्याने कुरकुरत का होईना कराराचे

नूतनीकरण होत असे. त्यादिवशी काही पेपर्सवर नविन भाईंच्या (कंपनीचे मालक) सह्या घेण्यासाठी मी त्यांच्या केबिनमध्ये गेलो होतो. आमच्या कॉंट्रॅक्ट सेलचे प्रमुख तपन दास तेथे आधीच त्यांच्याशी बोलत होते म्हणून मी परत जाण्यासाठी वळलो तर नवीन भाईंनी हाक मारून बोलावले आणि बसण्यास सांगितले.

दास जरा चिंतेत दिसले. ते नवीन भाईंना म्हणाले, "तर हे असे आहे. उद्यापासून मी महिनाभर रजेवर जाणार पण अजून हे IPPचे कॉंट्रॅक्ट काही क्लिअर होत नाही. मला त्याचीच काळजी आहे. बाकी सर्व कॉंट्रॅक्ट क्लिअर झाले आहेत.

दास हे कंपनीचे फार जुने व विश्वासू अधिकारी होते. नवीन भाई पण त्यांना फार मान देत असत. त्यामुळे ते शांतपणे दास बाबूंना म्हणाले, "तुम्ही कसलीही काळजी न करता रजेवर जा. सर्वात महत्त्वाचे मुलीचे लग्न आहे. कॉंट्रॅक्टचे काय हा दिनेश करेल क्लिअर."

"नाही नविन, नुसत्या सह्या आणायच्या असत्या तर प्रश्न नव्हता. पण तेथील काळे साहेब दहा परसेन्ट कमी करा म्हणून अडवत आहे. जे आपण अजिबात करू शकत नाही. मी स्वतः दोन वेळा गेलो पण ते भेटले नाहीत. जुना माणूस आहे दिनेशला दाद देईल असे वाटत नाही."

“काका तुम्ही उगाच काळजी करता. तुम्ही सर्व प्रकरण दिनेशला समजून सांगा. आवश्यक पेपर्स द्या आणि निवांत रजेवर जा.”नविनभाई म्हणाले. नंतर माझ्याकडे बघत म्हणाले, "दिनेश, सगळी केस समजून घे आणि ताबडतोब IPPला जा. सह्या घेतल्याशिवाय परत येऊ नकोस. नाहीच मिळाल्या तर तिकडूनच राजीनामा पाठव.”

झाले मग काय बोलणेच खुंटले असे म्हणत आम्ही दोघेही बाहेर आलो. बाहेर येताच दास बाबू मला म्हणाले, “त्याचे बोलणे मनावर घेऊ नको. त्याच्या समाधानाकरिता तरी IPPला जाऊन ये.”

“ठीक आहे.”

नंतर त्यांनी मला सर्व डिटेल्स समजावून सांगितले आणि एक फाईल मला देत म्हणाले, “अजून काही लागले तर मला फोन कर.”

“सर, तुम्ही गडबडीत असणार, माझा फोन मिस् झाला तर काळजी करणार त्याऐवजी काही प्रॉब्लेम नसला तर मी फोनच करणार नाही. थोडक्यात 'No news is good news' असे समजा.”

ते थोडे विचारात पडले मग थोडे हसून म्हणाले, “ठीक आहे. तसाही काय फरक पडणार आहे? होऊ दे तू म्हणतो तसे.”नंतर मात्र

अजिबात वेळ न घालविता घरी जाऊन बॅग भरली व सरळ संभाजी नगरला प्रयाण केले. सकाळी लवकर निघाल्याने मी तेथे अकरा वाजताच पोचलो. बरे होईल तीनपर्यंत काम आटपले तर आजच परतता येईल असे मनाशी म्हणत मी IPP कंपनीत पोचलो. तसा मी येथे आधी दोनतीन वेळा आलो होतो म्हणून मेन ऑफिस, फॅक्टरी परिचित होते. ऑफिसमध्ये जाताच मला समोरच गोरे दिसले. त्यांची आणि माझी आधीची ओळख होतीच. त्यांनी दिलखुलासपणे हसून माझे स्वागत केले.

“अरे वा, आज आमचे नशीब उजळले म्हणावे की काय? साक्षात दिनेशने आम्हाला दर्शन दिले. ' ते म्हणाले.

“करा चेष्टा गरिबाची.”मी उत्तरलो.

“काय लाईनवर काही काम निघाले आहे काय?”मी प्लॅन्टवर काम करणारा आहे हे त्यांना माहिती होते.

“नाही हो. एकदम वेगळे काम आहे. AMC रिन्यू करायचे.”

“का? दासबाबू कुठे गेले?"

“त्यांच्या मुलीचे लग्न आहे म्हणून रजेवर गेलेत.”

“अरे हो, मी विसरलोच होतो”असे म्हणून आम्ही दोघेही आत गेलो आणि त्यांच्या केबिनमध्ये बसलो.

त्यांनी लगेच फोनवरून चहा सांगितला आणि कॉन्ट्रॅक्टची फाईल बाहेर काढली.

“मी चेक केले आहे. फक्त काळेसाहेबांची सही बाकी आहे.”ते म्हणाले.

“सर जरा लवकर झाली तर बरे होईल. तीन दिवसांनी काँट्रॅक्ट संपेल.”मी म्हणालो.

“अरे एव्हढी काय काळजी करतो. चल आताच घेऊ”असे म्हणत ते फाईल घेऊन उठले आणि आम्ही दोघे काळे साहेबांच्या केबिनमध्ये घुसलो. काळे पंचावनच्या आसपास असावेत. फार खालून जी माणसे कष्ट करीत उच्चपदी पोचतात त्यांच्या चर्या जरा उग्र दिसतात. तशी त्यांची चर्या होती. त्यांच्या चेहऱ्यावर No nonsense here असा भाव होता. गोरेंनी माझी ओळख करून देत काँट्रॅक्टची माहिती सांगितली आणि फाईल समोर ठेवली.

तिच्याकडे अजिबात लक्ष न देता त्यांनी मला विचारले, “दासबाबू का नाही आले?"

“त्यांच्या मुलीचे लग्न आहे म्हणून ते रजेवर आहेत.”मी उत्तरलो.

तेवढ्यात गोरेंचा मोबाईल वाजला. गोरे ताबडतोब मोबाईल कानाला लावीत बाहेर पडले. एवढा वेळ मी उभाच होतो. त्याकडे

साफ दुर्लक्ष करीत ते म्हणाले, “म्हणून त्यांनी एवढ्या महत्वाच्या कामासाठी एका ज्युनिअरला पाठविले. This is the way you treat your customers.”

“तसे नाही सर, ते दोन वेळा आले होते पण तुमची भेट झाली नाही.”

"ओ हो. मला कल्पना नव्हती ते येणार आहेत अन्यथा मी माझी कामे पुढे ढकलली असती.”ते उपरोधानी म्हणाले.

आता काहीही बोलले तरी हा माणूस वाकड्यातच जाणार हे माझ्या लक्षात आले म्हणून मी गप्प बसलो.

“या कॉंट्रॅक्टचे तरी तुला काय माहिती आहे?"

“सर्व. मी प्रत्यक्ष काम पण केले आहे.”

झाले. ठिणगी पडायला एवढे वाक्य पुरेसे होते.

“तुम्ही काम करता तर मग आम्ही काय इथे मग पिकनिकला येतो काय?”ते मोठ्याने ओरडून म्हणाले.”तुम्ही समोर जे ठेवाल त्यावर सह्या करायला मी काय सह्याजीराव आहे काय? जा आत्ताच्याआत्ता त्या गोरेला पकडा आणि दहा टक्के किंमत कमी करून मग सहिसाठी आणा.”असे म्हणून ते ताडकन उठले आणि निघून गेले. त्यांच्या आवाजाने बाहेर असलेली सेक्रेटरी काय झाले हे बघण्यासाठी आत डोकावली. तीने नजरेनेच काय झाले असे

विचारले. तिच्याकडे बघताच मी झालेला अपमान विसरलो इतकी ती सुंदर होती.

“त्यांच मानसिक संतुलन बिघडलं.”मी म्हणालो, “हे असे नेहमीच वागतात काय? "

“काहितरीच काय. मी पहिल्यांदाच त्यांचा आवाज एवढा चढलेला ऐकला.”ती म्हणाली. तिचा आवाज पण मंजुळ होता.

“होतील बरे, चांगल्या डॉक्टरला दाखवा.”मी फाईल घेत म्हणालो, “बाय द वे, मी दिनेश अवस्थी, उद्यम इंजिनियरिंग. मी या आधी तुला कधी बघितले नाही अर्थात मी या ऑफिसला फारसा आलो पण नाही.”

“मी स्वरा “ती म्हणाली.

“पूर्ण नाव?”मी मुद्दाम विचारले.

“स्वरांजली दलपतराय महाबळेश्वरकर”ती शांतपणे उत्तरली. असल्या प्रश्नांची तीला सवय असावी.

“पत्ता नाही फक्त नाव विचारले “मी गमतीने म्हणालो.

“पत्ता नाही फक्त नावच सांगितले.”ती त्याच टोनींग मध्ये म्हणाली. फाईल घेऊन मी परत गोरे साहेबांकडे गेलो तर ते केबिनमध्ये नव्हते. दहा पंधरा मिनिटांनी ते आले. मी जेव्हा सर्व

वृत्तांत त्यांना जेंव्हा सांगितला तेव्हा माझ्यापेक्षा त्यांनाच जास्त वाईट वाटले.

“उगीच माझ्यामुळे तुला बोलणी खावी लागली”ते हळहळत म्हणाले.

“जाऊ द्या हो सर, बोलणी काही मला नवीन नाहीत. आता पुढे काय करायचे तेवढे सांगा"

“आता काय? सत्तेपुढे शहाणपण चालत नाही बाबा. त्यांनी एकदा डोक्यात एखादी गोष्ट घेतली की ते काही कोणाचे ऐकत नाही. तेव्हा तूच काय परत एकदा काँट्रॅक्ट चेक कर आणि आठ दहा टक्के कमी कर. नाहीतर माझी नोकरी गेलीच समज.”ते कळवळून म्हणाले.

“काहीतरीच काय बोलता सर. इतक्या लहानश्या गोष्टीवरून नोकरी कशी जाईल, तीही तुमच्यासारख्या माणसाची ! गेली तर माझीच जाईल.”

“तू तरुण आहेस. तुला काही जबाबदाऱ्या नाहीत. पण माझी मुले अजून शिकत आहेत आणि या वयात मला कोण नोकरी देईल?"

“सर तुम्ही काही काळजी करू नको. मी बघतो काय करायचे.”मी असे म्हणून कॉन्ट्रॅक्ट परत चेक करायला घेतले.

“इथेच बसून काम कर. मी जरा शॉपमध्ये जाऊन येतो. मला उशीर झाला तर स्वरा बरोबर जेवायला जा पण काम झाल्याशिवाय आज जाऊ नको.”असे म्हणत त्यांनी स्वराला बोलावले आणि तसे सांगितले. नंतर जवळपास तासभर काम केल्यावर माझ्या लक्षात आले की यात कमी करण्यासारखे काहीही नाही. अगदी काटेकोरपणे दास बाबूंनी काँट्रॅक्ट तयार केले होते. दहा परसेन्ट कमी करणे म्हणजे नुकसान सोसत काम करणे एवढेच झाले असते. तेवढ्यात स्वरा आलीच.

“चल दिनेश, जेवायला जाऊ या.”ती म्हणाली.

“अजून फक्त दहा मिनिटे. गोरेंनी आजच्या आज काम संपले पाहिजे असे सांगितले आहे. नाही तर त्यांची नोकरी जाईल असेही ते म्हणत होते.”

“त्यांना काय गरज आहे नोकरीची?”स्वरा अगदी सहजपणे म्हणाली.

“म्हणजे?"

“म्हणजे वाघाचे पंजे, “ती हसून म्हणाली.”ते घरचे चांगले आहेत इतके की ते सहज तुला, मला आणि काळेसाहेबांना घरकामाला ठेवू शकतात. फक्त स्वाभिमानी असल्याने नोकरी करतात इतकेच.”

मी गोरेंकडे पाणी भरत आहे, स्वरा स्वयंपाक करीत आहे आणि काळेसाहेब झाडूपोचा करीत आहे असे चित्र माझ्या डोळ्यासमोर तरळले आणि नकळत मला हसू आले.

"अरे हसतो काय? मी खरेच सांगत आहे. ते खूपच साधे आणि निगर्वी आहेत म्हणून कळून येत नाही.”

मी पटकन फाईल बंद केली आणि म्हणालो, “चल, जेवून येवू.”

स्वरा म्हणाली की जवळच एक नविन डायनींग हॉल सुरू झाला आहे तो ट्राय करू. म्हटले चला. रस्त्यात मी सारखा हाच विचार करीत होतो की गोरे माझ्याशी का खोटे बोलले असावेत. तेवढ्यात मला राकेशचा फोन आला. मी इतका विचारात गढलो होतो की मला रिंग वाजत आहे हे स्वराने लक्षात आणून दिले.

“अरे फोन घे, तुझी कोणी मैत्रीण असेल.”राकेशचा आवाज ऐकताच मला हायसे वाटले. मनात म्हणालो इतका हुकुमाचा एक्का आपल्या जवळ असता आपण उगीच डोक्याला ताप करून घेत आहोत. तेवढ्यात हॉल आल्याने मी स्वराला आत जाण्याची खूण केली आणि राकेशशी बोलू लागलो.

"अरे तू कुठे आहेस आणि काय करत आहेस?”राकेशने विचारले. त्याला मी थोडक्यात सगळे सांगितले आणि विचारले

की हे काय चालू आहे याचा तुला काही अंदाज येतो काय? त्यावर तो शांतपणे म्हणाला, “काळे आणि गोरे यांच्याबद्दल स्वरा सांगते ते खरे असेल तर ते दोघे मिळून कॉंट्रॅक्टची किंमत कमी करण्यासाठी हा खेळ खेळत आहे. हा एक मॅनेजमेंटचा प्रयोग आहे. यामध्ये एकजण रागावतो तर दुसरा गोंजारतो. दोघेही एकदम कधीच भेटत नाही. शेवटी आपण कंटाळून किंवा दया येऊन ते म्हणतील तसे करतो. हे मी वाचले आहे पण प्रत्यक्ष प्रयोग पहिल्यांदाच बघतोय.”

“ते मरू दे, आता काय करायचे ते सांग.”

नंतर पाच मिनिटे त्याने आता काय करायचे ते सविस्तर सांगितले. त्यामुळे माझ्यात एक नवीनच आत्मविश्वास आला. इतका की मी आत स्वरासमोर जाऊन बसलो तेव्हा तिलापण माझ्यातला बदल जाणवला.

“मैत्रिणीने टॉनिक दिलेले दिसते कारण चेहरा फुललेला दिसतो.”ती म्हणाली. इतक्या कमी वेळात आमची वेव्हलेंथ चांगलीच जुळली होती. खूप जुनी ओळख असल्यासारखे आम्ही चेष्टा मस्करी करू लागलो होतो.

“मैत्रीण नाही मित्र. त्याचे नांव राकेश आहे.”

“फास्ट फ्रेंड दिसतो.”

“नुसता फ्रेंड नाही तर फिलॉसॉफर आणि गाईड पण आहे.”

“होय का, मग काय एव्हढा कानमंत्र दिला मित्राने?"

“नुसता कानमंत्र नाही अंतरदृष्टी दिली.”

“अच्छा, मग सांग आता काय काय काय होणार ते “ती मिस्कील पणे हसून म्हणाली.

“आता आपण जेवणार आहोत आणि जेवतांना कामाची चर्चा नको.”

मग जेवतांना आम्ही एकमेकांची घरची माहिती शेअर केली. स्वरा कंपनीच्या कॉलनीत तिच्या बाबांबरोबर राहत होती. तिचे बाबा सरकारी नोकरितून नुकतेच निवृत्त झाले होते. नातेवाईक फारसे नव्हतेच आणि जे काही होते ते गावाकडेच होते. स्वरा एकुलती होती त्यामुळे ती कामावर गेल्यावर त्यांना दिवस खायला उठत असे. माझ्या एकाच गावात राहणाऱ्या नातेवाईकांबद्दल ऐकून तिला गंमत वाटली. अशाच हलक्याफुलक्या वातावरणात जेवण झाले. जेवण खरेच छान होते. मी स्वराला म्हणालो की जर या वाघसिंहांना भेटायचे नसते तर अजूनही जेवतच बसलो असतो. त्यावर ती हसून म्हणाली, “बघू या, आता घोडामैदान जवळच आहे.”

मी गमतीने तीला एवढेच म्हणालो, “तू डबल रोल असलेले हिंदी सिनेमे बघितले आहे काय?"

“त्याचा इथे काय संबंध?”ती गोंधळून म्हणाली.

“त्या सर्व सिनेमात मध्यंतरानंतर एक बदल समान असायचा. जे पात्र आधी मार खात असायचे ते मध्यंतरानंतर मार द्यायला सुरुवात करायचं. आता इथे पण तेच होणार आहे.”

“मिस्टर दिनेश हा हिंदी सिनेमा नाही. जेवढे बोलत आहे त्याच्या निम्म्याने तरी करून दाखव.”मॅडम, मी अजून काहिच बोललो नाही आणि जे मी बोलत नाही ते मी नक्कीच करतो.”असे बोलत आम्ही ऑफिसमध्ये प्रवेश केला.

------------------*------------

## प्रकरण ५

काळे केबिनमध्ये कोणाशीतरी बोलत होते आणि गोरे गायब होते.

“आता मला बघून काळे त्या माणसावर ओरडतील”मी स्वराला म्हणालो. खरेच पाच मिनीटांनी काळेंचा ओरडण्याचा आवाज ऐकू आला. थँक्स टू राकेश.

विस्मयाने माझ्याकडे बघणाऱ्या स्वराला मी म्हणालो, “आता जेव्हा ते बोलावतील तेव्हाच मला सांग.” मी स्वरासमोरच्या सोफ्यावर आरामात बसलो. तो माणूस निघून गेला. नंतर दहा मिनिटे अशीच गेली. मी हलत नाही असे बघून काळेंनी स्वराला हाक मारली आणि मला बोलावले. मी केबिनच्या दारापर्यंत गेलो आणि तिथूनच विचारले, “सर, तुम्ही मला बोलावले?"

ते जागेवरूनच ओरडून म्हणाले, “तूला वेगळे बोलवावे लागते काय? तुझ्या काँट्रॅक्टची काळजी तुला नाही काय?"

मी फाईल घेऊन सरळ त्यांच्या समोर जाऊन बसलो आणि म्हणालो, “काळजी तर आहेच सर. पण तुम्ही म्हणाला होता की

गोरे साहेबांना बरोबर घेऊन ये आणि त्यांचा तर काही फोन लागत नाही म्हणून बाहेर बसलो होतो.''

“बर, बर सगळेच बॅरिस्टर आहेत. स्वरा, गोरेंना बोलावं पाहू. दिनेश तोपर्यंत काय चेंजेस केलेस ते दाखव.''

“सॉरी सर, मी सर्व प्रकारे चेक केले पण कोठेही कमी करता आले नाही त्यामुळे हे काँट्रॅक्ट आपल्याला रद्द करावे लागणार आहे.''मी शांतपणे म्हणालो.

संतापाने लाल होत काळे म्हणाले, “तू काय बोलतो आहे हे तुला तरी कळते काय? कस्टमरला न सांगता तू असे कसे एकतर्फी काँट्रॅक्ट रद्द करू शकतो? तुला हा अधिकार कोणी दिला?"

राकेशच्या टिप्स आठवत अतिशय नम्रतेने पण ठामपणे मी म्हणालो, “एक महिना आधीपासून माझ्या कंपनीने काँट्रॅक्ट रिन्यूअल साठी कागदपत्रे सादर केली आहेत तेव्हा हा निर्णय एकतर्फी नक्कीच नाही. नुकसान सोसत कोणीही बिझनेस करू शकत नाही. मला कंपनीने अधिकार दिलेत म्हणून मी त्याचा वापर करीत आहे.''

यावर काय बोलावे हे त्यांना सुचले नाही कारण अशी परिस्थिती निर्माण होईल हे त्यांनी गृहीत धरले नव्हते. तरीही ते रेटून

म्हणाले, “याचे काय परिणाम होतील याची तुला कल्पना आहे काय?"

“फारतर मला बळीचा बकरा करण्यात येईल आणि माझी नोकरी जाईल. महिनाभर सिस्टीम झटके खाईल, तुम्ही नशीबवान असलात तर दुर्घटना होणार नाही. नंतर उच्च पातळीवर बोलणी होतील आणि काँट्रॅक्ट परत रिन्यू होईल.”मी शांतपणे म्हणालो.

“एवढे सर्व माहिती आहे तर आताच किंमत कमी का करत नाही?”त्यांनी विचारले पण आवाज बराच खाली आला होता.

“मी आधीच सांगितले आहे. नुकसान सोसत कोणी धंदा करत नाही. बरे ते जाऊ द्या. हे लेटर घ्या.”

“हे काय अजून?”त्यांनी लेटर घेत विचारले.

“काँट्रॅक्ट टर्मिनेशन लेटर. याची एक कॉपी मी फॅक्टरी इन्स्पेक्टरला देण्यासाठी आता जात आहे. म्हणजे तीन दिवसा नंतर सिस्टिमची पूर्ण जबाबदारी आमच्या कंपनीकडे कायदेशीर रित्या नसणार.”

तेवढ्यात गोरे आलेत. त्यांना बघताच मी उठलो आणि त्यांना म्हणालो, “मी सरांना सर्व सांगितले आहे. आता मी शॉपमध्ये

जाऊन आमच्या लोकांना पण कल्पना देणार आहे.”असे म्हणून मी सरळ बाहेर पडलो.

बाहेर येताच मी स्वराला म्हणालो, “तुला म्हणून सांगतो, आता जर हे वाघसिंह मला शोधतील तर शोधू दे पण अर्ध्या तासाने मी येईन.”

स्वरा काळजीने म्हणाली, “जरा जपून. रिबाऊंड झालं तर महाग पडेल.”

“काही होत नाही. Don't fear when I am here.”

अर्धा तास मी शॉपमध्ये जाऊन आमच्या लोकांशी कामाची चर्चा केली. विशेष म्हणजे काळेसाहेबांनी येत्या तीन दिवसात कामा संदर्भात काही सुधारणा सुचविल्या होत्या त्या खरेच अतिशय सुरेख होत्या. त्यासाठी लागणारे साहित्य मी पुण्याला फोन करून ताबडतोब बोलावले. दरम्यान मला दोन तीन कॉल आले पण मी त्याकडे साफ दुर्लक्ष केले. अर्ध्या तासाने मी सावकाश परत ऑफिसला गेलो आणि स्वराला म्हणालो की मी आल्याचे काळेंना सांग.

“ते तुलाच शोधत आहे.”

“म्हणूनच त्यांना सांग.”

तिने तसे सांगताच त्यांनी मला लगेच आत पाठव म्हणून सांगितले. आत जातेवेळी मी तिला नाटकाचा शेवटचा अंक बघायचा असेल तर आत ये असे म्हणालो. तिला पण उत्सुकता होतीच म्हणून ती माझ्याबरोबर आत आली. जोडी आत बसलीच होती.

आत जाताच काळेंनी समोरच्या खुर्चीकडे हात करीत बसण्याची खूण केली. नंतर संभाषणाची सूत्र गोरेंनी हाती घेतली.

“दिनेश, मी सरांना सर्व विस्ताराने सांगितले आहे. माझ्या आधीच्या ब्रिफिंगमध्ये काही गोष्टी निसटल्या होत्या त्यामुळे त्यांना दहा टक्के मार्जिन कमी करण्यासाठी स्कोप आहे असे वाटले. पण आता सर्व क्लिअर आहे आणि जी किंमत आहे ती रास्त आहे असे आम्हा दोघांचेही मत आहे.”

मी मनातल्या मनात गोरेंना दाद दिली. त्यांचे 'फेस सेव्हिंग टेक्निक ' सर्वोत्तम होते. स्वतःकडे थोडा कमीपणा घेत त्यांनी काळेंचा इगो जपत मीच जणू काही किंमत वाढवून मागत आहे असे चित्र उभे केले होते. आता उगीच ताणून धरण्यात अर्थ नव्हता म्हणून मीच म्हणालो, “ठीक आहे. माझी काहीच हरकत नाही. मग हे काँट्रॅक्ट रिन्यू झाले असे मी समजू काय?"

“अर्थात, “माझ्या समोर सह्या करीत काळे म्हणाले, “दिनेश, सकाळी मी जरा जास्तच बोललो त्याबद्दल....”

ते पुढे काही बोलायच्या आत मी त्यांचे वाक्य अर्ध्यात थांबवित जाऊ द्या सर, कामाच्या भरात असे होतच असते असे म्हणालो शिवाय इतक्या सिनिअर माणसाने एव्हढे बोलावे हे पण माझ्यासाठी खूप होते. इतर वेळी मी इतकी बोलणी खातो की तुलनेने हे हारतुरेच होते. म्हटले आपली झाकली मुठ बरी.

पण त्यांना बरे वाटावे म्हणून मी अजून एक पुस्ती जोडली आणि त्यांना सांगितले की त्यांनी सुचविलेल्या तिन्ही सुधारणा येत्या तीन दिवसात पूर्ण करण्यासाठी लागणारे मटेरियल उद्या येईल. त्यावर मात्र ते मनापासून खुश झाले आणि त्यांनी मला तीन दिवस थांबून त्या पूर्ण करण्याचे सुचविले. एव्हढेच नव्हे तर त्यांनी तीन दिवसाकरता माझी सोय कॉलनीतील गेस्ट हाऊस मध्ये करण्यास स्वराला सांगितले. मला काय आंधळा मागतो एक डोळा देव देतो दोन असे झाले.

मी, स्वरा आणि गोरे बाहेर येताच, गोरेंनी फाईल स्वराकडे दिली आणि ऑर्डर कॉपी तीन दिवसांत दिनेशकडे दे असे सांगून ते त्यांच्या केबिनकडे जाऊ लागले. नंतर अचानक त्यांना काहीतरी

आठवले आणि ते परत मागे वळून माझ्याकडे आले. मी स्वराकडून माझी बॅग घेत होतो.

“अरे दिनेश, मला एक गोष्ट कळली नाही. तू जर कॉन्ट्रॅक्ट टर्मिनेशन लेटर साहेबांना दिले होते तर नवीन मटेरियल पुण्याहून का बोलावले?”ते मिस्किल पणे म्हणाले.

“कारण ' तू रागाव, मी गोंजारतो ' हे ट्रेनिंग माझेपण झाले आहे.”मी त्यांच्या नजरेला नजर देत म्हणालो.

यावर आम्ही तिघेही मोकळेपणे हसलो.

---------------*----------------

# प्रकरण ६

ऑफिस सुटल्यावर मी स्वराबरोबर कॉलनीतल्या गेस्ट हाऊसला गेलो. कॉलनी छोटी पण टुमदार होती. सरळ रेषेतील सुबक घरे, बाजूला फुटबॉल आणि क्रिकेटचे मैदान, एक स्टेडियम जिथे कंपनीच्या वार्षिक स्पर्धा होत असत आणि या सर्वांना जोडणारे छोटे डांबरी रस्ते. रस्त्याच्याकडेला भरपूर झाडे, ठराविक अंतरावर असलेले सोडियम व्हेपरचे दिवे, बसायला बाक असे रमणीय दृश्य होते. कॉलनीत काही आवश्यक दुकाने, पिठाची चक्की, एक छोटा दवाखाना आणि मेडिकल शॉप असल्याची माहिती स्वराने दिली. आम्हाला बाहेरुन सहसा काही आणायची गरज पडत नाही हे पण तिने सांगितले. गेस्ट हाऊसपासून स्वराचे घर जवळ होते. गेस्ट हाऊस पण छान होते पण जेवणासाठी कंपनीत जावे लागणार होते. म्हणून स्वराने रोज तिच्याकडे जेवण्यास सांगितले. तेवढीच बाबांना पण कंपनी होईल असे ती म्हणाली. या प्रस्तावाला मी नकार देणे शक्यच नव्हते.

तेवढ्यात मी नविनभाई आणि दासबाबू यांना फोन केला आणि वृत्तांत सांगितला. मोबाईल खिशात ठेवताच तिने नाटकाच्या लेखकाला कळवणार नाही काय असे विचारले. तिच्या

प्रश्नाचा रोख ओळखून मी पण तिला तो फोन खास असल्याने रात्री झोपण्यापूर्वी होईल असे सांगितले. नंतर आम्ही सरळ तिच्या घरीच गेलो. तिने माझी व बाबांची ओळख करून दिली. आमचे जमायला फारसा वेळ लागला नाही. तिचे बाबा बहुश्रुत होते. त्यांना कोणी श्रोता मिळत नव्हता हा त्यांचा मुख्य प्रश्न होता. जुन्या हिंदी गाण्यापासून ते जॉर्डनच्या निर्वासितांच्या प्रश्नांपर्यंत कोणताही विषय त्यांना वर्ज्य नव्हता. त्यामुळे ते लगेच खुलले. नंतरचे तीन दिवस झपाट्याने गेले. काम संपल्यावर काळेंना ते दाखविले. ते अर्थातच खुश झाले. मी खरे तर त्याच दिवशी निघू शकलो असतो पण स्वराने आग्रह केला म्हणून दुसऱ्या दिवशी सकाळी निघायचे ठरवले. त्या रात्रीचे जेवण एकदम खास झाले. बाबा पण खुशीत होते. जेवण झाल्यावर जरा फिरून येतो असे म्हणून मी आणि स्वरा बाहेर पडलो.

कॉलनी सोडताच कंपनीकडे जाणाऱ्या रस्त्यावरून आम्ही फिरावयास निघालो. रस्त्यावर तुरळक उजेड होता. टिपूर चांदणे कॉलनी आणि मैदानावर पसरले होते. मी तसा काही कविमनाचा नाही पण ते रेखीव वातावरण, निशब्द शांतता आणि पसरलेले टिपूर चांदणे यांनी मिळून मनावर एक गारुड केल्यासारखे झाले

होते. असे वाटत होते की असेच संथपणे चालत राहावे. नकळत आमचे हात गुंफले गेले आणि स्वरा म्हणाली, "उद्या तू जाणार?"

“होय.”

“बाबा गेले तीन दिवस फार खुशीत होते. एवढे आनंदात मी त्यांना कधीच बघितले नाही.”

“आनंद सांसर्गिक असतो.”

“चल, परत जाऊ या.”

न बोलताच मी परतलो आणि आम्ही परत काही न बोलता चालू लागलो. वातावरणाचा प्रभाव अजून मनावर कायम होता. बहुतेक तिच्याही मनावर तेच गारुड झाले असावे. कारण मी तिला घरापर्यंत सोडले आणि अचानक आम्ही एकदमच एकमेकांचे दोन्ही हात हळुवारपणे हाती घेत विचारले, “आपण केव्हा लग्न करायचे?"

आपण काय बोललो हे लक्षात येताच लाजून ओंजळीत आपला चेहरा लपवित ती घरात पळाली आणि मी गेस्ट

हाऊसला परतलो.

दुसऱ्या दिवशी स्वराच्या फोननेच मला जाग आली. अहो महाराज पुण्याला जायचे की नाही? ती विचारत होती. लवकर

तयार होऊन ये आणि हो बाबांना मी संध्याकाळी सांगणार आहे असे म्हणून तिने फोन कट केला. अर्ध्या तासात तयार होऊन आणि बॅग घेऊन मी तिच्याकडे गेलो. बाबा वाटच बघत होते. चहा घेता घेताच मी कॅब बुक केली. स्वरा कप आत ठेवायला गेली तेवढ्यात बाबा अनपेक्षितपणे म्हणाले, “दिनेश, माझ्या मुलीला सुखात ठेवशील ना?”

मी चमकून त्यांना विचारले, “म्हणजे स्वराने तुम्हाला...?"

“नाही तिने काही सांगितले नाही. पण या गोष्टी सहज ओळखू येतात.”

“तुम्ही कसलीही काळजी करू नका.”असे म्हणत मी आईचा आणि राकेशचा नंबर त्यांना दिला.

तेवढ्यात स्वरा बाहेर आल्याने आमचे बोलणे थांबले आणि बाहेरून कॅबवाल्याने पण हॉर्न दिला. मी पटकन बाबांच्या पाया पडलो आणि उजवा हात त्यांच्या समोर पसरून म्हणालो, “भातक?"

ते खदखदून हसले आणि माझ्या हातात शंभराची नोट कोंबून म्हणाले, “हे घे, काहीतरी घेऊन खा आणि आईला सांगू नको.”

स्वरा डोळे विस्फारून हा प्रकार बघत होती. शेवटी न राहवून ती ओरडलीच, “दिनेश हा काय प्रकार चालू आहे मला कळेल काय?"

बाबांना विचार असे म्हणत मी कॅबमध्ये बसलो आणि निघालो.

घरी कसे सांगायचे हा प्रश्न माझ्यासमोर अजिबात नव्हता कारण आमच्याकडे या बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य होते. त्यामुळे घरी गेल्यावर थोड्या वेळातच मी आईला झालेली घडामोड सांगितली. तिने शांतपणे सर्व ऐकून घेतले आणि स्वराला आणि तिच्या बाबांना सुट्टीच्या दिवशी बोलावून घेण्यास सांगितले. आधी मुलगी तर बघू दे असे तिचे म्हणणे पडले. योगायोगाने राकेश पण तेव्हा घरीच होता. आईचे बोलणे होईस्तोवर तो गप्पच होता. तेवढ्यात आमच्या घरी कसल्या तरी मुलाखतीच्या निमित्ताने आलेली शारदा ही आईच्या मैत्रिणीची मुलगी आली. ती पण इंजिनियर होती. आमचे घर मध्यवर्ती असल्याने कोणी परीक्षेच्या निमित्ताने तर कोणी वधुवर संशोधनासाठी अश्या विविध कारणांनी भरलेले असे. त्यातही आईची वृत्ती माणसे जोडण्याची असल्याने तिला यात स्वारस्य होते. तसे तिने बसल्या जागी आठ दहा लग्ने सहज

जमवली असतील. तर ही शारदा नेमकी राकेश आल्यावरच का येते हे इतरवेळी माझ्या लक्षात आले नसते पण आज आले.

म्हणून मी मुद्दाम आईला म्हणालो, “आई आता माझी काळजी करू नकोस. या राकेशचा विचार कर नाहीतर तो म्हणेल त्याची कोणीच काळजी करत नाही.”

काही न समजून आई म्हणाली, “खरच की, तुमचे जुळयांचे दुखणे आहे हे मी विसरलेच होते. सांग बाबा राकेश तुझ्या काय अपेक्षा काय आहेत.”

राकेश म्हणाला, “आई, तू सांगशील त्या मुलींबरोबर मी लग्न करेन.”

त्याच्या या म्हणण्यामागे एक पार्श्वभूमी होती. आम्ही दोघेही कॉलेज मध्ये असता राकेश होस्टेलवर राहात असे. एकदा मी त्याच्या रूमवर गेलो असता तो तापाने फणफणलेला दिसला. मी सरळ त्याला उचलून घरी घेऊन आलो. आमच्या घरी असे प्रकार नवीन नव्हते. दोन तीन दिवसांनंतर तापाचा जोर ओसरताच आईने त्याला घरच्या कोणाला बोलवायचे काय असे विचारल्यावर त्याने मला घर नाही असे सांगितले होते. त्यावरून आईने त्याला परत असे बोललास तर फटके मिळतील, आजपासून हेच तुझे घर असे

बजावले होते. तेव्हापासून तो फक्त आई आणि माझ्याशी मोकळेपणाने बोलत असे.

“ते काही सांगू नको. दिनेश पण असेच म्हणायचा. पण तू हा असा अबोल, तुझी काळजी घेणारी, तुला समजून घेणारी अशी मुलगी शोधावी लागेल.”

तेवढ्यात शारदेने राकेशसमोर डिश ठेवलिपण होती आणि ती राकेशजवळ सहजगत्या येऊन बसली.

आई पुढे बोलतच होती, "दिन्या, हे सर्व तुझ्यामुळे झाले आहे. ते निस्तरावे पण तुलाच लागेल. ताबडतोब गुरुजींना बोलाव. त्यांची आणि माझी यादी ताडून बघू आणि वधूसंशोधन सुरू करू.”

आई बोलत असता शारदा राकेशला हाताने ढोसून काही बोल असे सुचवीत होती तर राकेश बोलायला घाबरत होता. शेवटी शारदेने टेबलाच्याकडेशी मला दिसेल असे हात जोडले. आमच्या कार्तिकेयाने (राकेशने) पण अनुकरण केले.

म्हणजे आमच्या घरातच ही प्रेमकहाणी घडत होती तर. शेवटी मीच आईला हसून म्हणालो, “आई, तू उगीच काळजी करते. तू म्हणते तशी मुलगी राकेशच्या बाजूलाच बसली आहे. जरा नीट बघ.”

मग काय, तोफेचा भडिमार झाला. निष्पन्न एवढेच झाले की रविवारी स्वरा आणि बाबा यांच्या बरोबर शारदेचे आईबाबा पण आले. बरोबर महिन्याने दोन्ही लग्ने एकाच मांडवात लागली.

---------------*----------------

## प्रकरण ७

नविनभाई, दासबाबू, काळे आणि गोरे आवर्जून लग्नाला आले होते. माझी सेक्रेटरी पळवली म्हणून काळेसाहेबांनी नविनभाईंकडे तक्रार केलीच. राकेशच्या आधीच्या कंपनीतील सहकारीही आले होते. सावंतसाहेब सोडून. लग्नाची नवी नवलाई ओसरताच आता आम्ही चौघेही जोमाने कामाला लागलो. शॉप उभारणीचे काम जोरात सुरू होतेच. माझ्याही कंपनीचे ऍग्रिमेंट झाल्याने मी ठरल्याप्रमाणे राजीनामा दिला. नविनभाईंनी थांबवायचा प्रयत्न केला पण मी नम्रपणे नकार दिला.

इकडे राकेशने परवाने, प्रमाणपत्राची सर्व कामे पूर्ण केली होती. रेंगाळले होते ते फक्त बँकेचे कर्ज. तिथे मात्र तारीख पे तारीख चालू होते. बरेचसे बांधकामाचे साहित्य येऊन पडल्याने आम्ही एक रखवालदार ठेवला होता. त्याला एक कामचलाऊ टपरी पण करून दिली होती. आमच्या बाजूलाच गोपाल इंजिनियरिंग या कंपनीचे बांधकाम सुरू होते. तशी ती कंपनी बरीच मोठी होती पण बांधकाम मात्र फारच संथ गतीने सुरू होते. आजूबाजूला पण पाचसहा छोट्या कंपन्या होत्या. त्यासर्वांसाठी एक टपरी वजा हॉटेल सुरू झाले होते. तेथे फक्त चहा नाश्ता मिळत असे. अशाच

एका सायंकाळी मला गोपाल इंजिनिअरिंगच्या आवारात एक वयस्कर गृहस्थ खुर्चीत बसलेला दिसला. जवळ जाताच बघितले तर एक मी त्याला आधी कधीच बघितले नव्हते. मी सरळ टपरिवरून दोन चहा घेवून त्याच्याकडे गेलो.

“नमस्कार, गरम चहा घ्या, “मी त्यांना चहा देत म्हणालो, “मी दिनेश, बाजूलाच आमचे बांधकाम सुरू आहे.”

“मी शंकर राठी. तुम्ही कशाला त्रास घेतला?”चहाचा कप घेत ते म्हणाले.

“त्यात कसला आलाय त्रास? म्हटले तुम्ही एकटेच बसलाय, कंटाळला असाल घ्यावा चहा बरोबर.”

“तुमचे काय प्रॉडक्ट आहे?"

“वॉशिंग मशीन. पण मध्यमवर्गीयां साठी खास बनविलेले"

"केव्हा लाँच होणार?"

“सध्या बोर्डावरच आहे पण सहा महिन्यात करायचा विचार आहे.”

“माफ करा, मी जरा जास्तच चौकश्या करत आहे पण त्या मानाने जागा जरा लहान नाही काय?"

तेवढ्यात मला राकेश येतांना दिसला. मी त्याला हाक मारून बोलावले आणि ओळख करून दिली.

"हा माझा मित्र आणि पार्टनर."

ते कौतुकाने म्हणाले, "बऱ्याच वर्षांनी कोणी धडपडणारे तरुण भेटल्याने फार आनंद झाला."

नंतर त्यांनी मशीनबद्दल आणि आमच्या योजनेबद्दल थोडीफार माहिती विचारली ती आम्ही अर्थातच आनंदाने पुरवली. सर्व ऐकून झाल्यावर ते जरा विचारात पडल्यासारखे वाटले. म्हणून राकेशने त्यांना आमचे काही चुकत आहे का असे विचारले.

त्यावर ते शांतपणे म्हणाले, "मी स्पष्ट पणे यावर बोललो तर तुम्हाला राग तर येणार नाही?"

"अजिबात नाही. घरी व्यवसायाची पार्श्वभूमी नसल्याने मुळात आम्हाला यावर कोणी काही मार्गदर्शन करतच नाही. जे काही सेमिनार मध्ये सांगितले जाते तेवढिच ऐकीव माहिती आम्हाला आहे."

"मला दोन गोष्टी खटकत आहे. एक, तुमचे जे प्रॉडक्ट आहे ते मजबूत आहे, आटोपशीर आहे आणि कामाला उत्तम आहे. हाय फाय गोष्टींना फाटा दिल्याने तुम्ही इतरांपेक्षा वीस टक्क्यांनी किंमत

कमी ठेवू शकाल आणि तुमचा ग्राहक प्रामुख्याने मध्यमवर्गीय असणार. बरोबर?"

"बरोबर "

"किंबहुना 'मध्यमवर्गीय लोकांसाठी खास' अशी जाहिरात करण्याचे तुमच्या मनात घोळत असणार. पण मला वाटते इथेच खरा धोका आहे. कोणत्याही गृहिणीला तिच्या मैत्रिणी, शेजाऱ्यां जवळ असे सांगायला कधीच आवडत नाही की अमुक एक वस्तू स्वस्त आहे म्हणून आम्ही घेतली. नाहीतर एव्हढे गरीबाकरिता म्हणून गाजावाजा करीत आणलेले ब्रँड आदळले नसते. बघा हे गृहिणींचे मानसशास्त्र आहे. कोणत्याही सेमिनारमध्ये हे सांगत नाही."

"दुसरी गोष्ट?"राकेश.

"तूम्ही एकाच प्लॅनवर अवलंबून आहात. उदाहरणार्थ बँकेचे कर्ज मंजूर झाल्यावर काम सुरू करू. देव करो तसे न घडो पण समजा बँकेने वेळेवर कर्ज नामंजूर केले तर? शेवटी ती एक संस्था आहे, तिचे नियम वेळेवर बदलू शकतात हे गृहीत धरून तुमचे किमान तीन तरी पर्यायी प्लॅन्स तयार असले पाहिजेत."

"तूम्ही एखादा पर्यायी प्लॅन सुचवू शकता?"राकेश.

आपले कार्ड मला देत ते म्हणाले, “जरूर. माझे येथील डिश अँटीनाचे काम रखडले आहे. तुमचे बांधकाम आणि असेंम्बली लाईन तयार दिसत आहे. थोडे फेरफार केले तर तुमचेही काम होईल आणि माझेही. तुमची तयारी असल्यास ते तूम्ही करू शकता. या पत्त्यावर केव्हाही येऊन भेटा. तेथे आपण सविस्तर बोलू आणि हो तुमच्या बाकीच्या पार्टनर्स बरोबर पण चर्चा करा.”

असे गमतीने म्हणत ते जाण्यासाठी उठले.

आम्ही दोघेही जरा विचारात पडलो होतो. घरी चौघेही मिळून ठरवू असा विचार करीत आम्ही घरी गेलो.

जेवण झाल्यावर आम्ही चौघेही एकत्र बसलो. राठींशी झालेले बोलणे राकेशने सविस्तर सांगितले आणि प्रत्येकाचे मत विचारले.

त्यांचे गृहिणींबद्दलचे मत आहे ते खरे आहे असे शारदा आणि स्वरा म्हणाल्या.

“पण आता त्याचा विचार का करायचा.”मी विचारले.

“कारण बँकेने आपले लोन नामंजूर केले आहे. मॅनेजर म्हणतो की हेड ऑफिसने रिजेक्ट केले.”राकेश शांतपणे म्हणाला.

“ऐनवेळी बँक असे कसे करू शकते.”मी चिडून विचारले.

“करू शकते. राठींचा एक एक शब्द आठव. म्हणून तर मी त्यांना पर्याय विचारला.”

“पुढे काय?”स्वरा.

"राठींची ऑफर स्वीकारायची म्हणजे काम सुरू होईल. काही उलाढाल होईल. अनुभव पण गाठीशी येईल. तात्पुरता तरी वॉशिंग मशीनचा प्रोजेक्ट बाजूला ठेवू.”

असे म्हणतांना राकेशला वाईट वाटत असले तरी त्याने तसे दर्शविले नाही.

शेवटी सर्वानुमते मी आणि राकेशने दुसऱ्या दिवशी राठींना भेटावे असे ठरले.

गोपाल भवनला पोचताच मी राठींनी दिलेले कार्ड जे नीटसे वाचले पण नव्हते ते गेटवर दाखवताच जणू जादूची कांडी फिरविल्यासारखा परिणाम झाला आणि पाच मिनिटांत एका प्रशस्त केबिन मध्ये आम्ही दोघेही दाखल झालो. एका भल्या मोठ्या टेबलाच्या मागे रिव्हॉलविंग चेअरमध्ये आम्हाला काल भेटलेले गृहस्थ, शंकर राठी बसलेले होते. आम्ही येताच ते लगेच उठून जवळ आले आणि हस्तोलंदन करत हसून म्हणाले, “या या. गोपाल इंजिनियरिंग मध्ये आपले स्वागत आहे.”

आपण ज्याला काल टपरीवरचा चहा पाजला तो गोपाल इंजिनियरिंगचा मालक असल्याचे कळल्याने मला तर फारच लाज वाटू लागली. तुलनेने राकेशची स्थिती बरी होती.

"सॉरी सर, मला कल्पना नव्हती की आपण..’’मी कसाबसा बोलायचं प्रयत्न केला.

“अरे, सॉरी कशाबद्दल. उलट मीच तुम्हा दोघांचेही आभार मानायला हवेत. माझ्या प्रॉब्लेमवर तुमच्या डायरेक्टर बोर्डाने फार लवकर निर्णय घेतला म्हणून. बर आता प्रमुख विषयाकडे वळू. नको, आधी चहा घेवू, काय दिनेश?’’असे म्हणत पाच मिनिटात त्यांनी आमचा संकोच घालवला. चहा घेतांना त्यांनी जणू काय कालचे बोलणे पुढे सुरू केले. त्यांनी हे पण आम्हाला सांगितले की सध्या जरी डिश अँटिनाची भरपूर मागणी असली तरी ती कायम राहील हे गृहीत धरू नका. अशा प्रॉडक्टच्या शोधात राहा ज्याची उद्योगाला सतत गरज भासते. तोपर्यन्त कोणत्याही कामाला नाही म्हणू नका.

नंतर त्यांनी संबंधीत विभागाच्या प्रमुखांना बोलावून आपले डिश अँटिनाचे काम हे करणार आहेत तरी यांना काय लागेल ती मदत करा पण तीन दिवसात काम सुरू होईल हे बघा असे सांगितले.

यानंतर मात्र आम्ही नेटाने काम केले. वेळप्रसंगी स्वतः काम केले पण सर्व ऑर्डर्स वेळेवर पूर्ण केल्या. मोठ्या कंपन्यांना लागणारे सुटे पार्ट बनविण्यास आम्ही सुरवात केली. सचोटी,

गुणवत्ता आणि वेळेत पुरवठा करणे या आमच्या वैशिष्ट्यांमुळे लवकरच आमचे नाव झाले. बघता बघता आमच्या 'भरोसा' लहानश्या कंपनीचा विस्तार वाढला. सुरवातीला दहा कामगार होते ते वाढून तीस झाले. जसा व्याप वाढला तशी कुशल कामगारांची गरज भासू लागली. हेड हंटर ही एक एजन्सी आम्हाला लागणारे सर्व प्रकारचे मनुष्यबळ पुरवीत असे. अशी वेगळी एजन्सी असली तर आपला बराच वेळ आणि पैसा वाचतो. जाहिरातीपासून ते मुलाखतीपर्यंत सर्वं तेच बघतात आपण फक्त आपल्या अपेक्षा, देऊ केलेला पगार त्यांना कळविल्या की झाले. त्यांना योग्य वाटणारे दोन किंवा तीन उमेदवार ते समुद्रमंथन करून आपल्याकडे पाठवतात. एजन्सीचे संचालक वेदपाठक आता चांगल्याच परिचयाचे झाले होते.

एव्हढे सर्व असले तरी राकेशला आणि मला पण एका गोष्टीचे वैषम्य सतत वाटत असे. ते म्हणजे आमचे स्वतःचे असे काही प्रॉडक्ट नव्हते याचे. जे काही होते ते उत्तम असले तरी तसे आम्ही परावलंबीच होतो. स्वरा आणि शारदा यांना पण ती खंत होतच. डोळे आणि कान उघडे ठेवा, तुम्हाला जरूर ते सापडेल हा राठींचा मंत्र आम्ही चौघेही विसरलो नव्हतो.

--------------*---------------

# प्रकरण ८

स्पेअर पार्ट्स बनविणे आणि विकणे हे जेवढे सोपे वाटते तेवढे नसते. केवळ आम्ही गुणवत्ता आणि दर्जा राखतो असे म्हणून जर कोणी या धंद्यात उतरेल तो टिकेलच असे नाही. इथेही जे प्रस्थापित असतात ते तुम्हाला टिकू देत नाही. त्यांच्याशी स्पर्धा करतांना सर्व मार्ग चोखाळावे लागतात. असाच एक प्रसंग आमच्याबाबतीत पण घडला. सर्व मोठया कंपन्यात कॉस्ट कंट्रोलिंग सतत सुरू असते. त्यांच्या प्रॉडक्टच्या किंमती वाढू न देण्यासाठी किंवा मर्यादेत ठेवण्यासाठी हे आवश्यक असते. खाजगी क्षेत्रात पण कोटेशन देतेवेळी संगनमत करणे किंवा रेट जास्त कोट करणे, ऑफिसर्स फितविणे हे प्रकार होतातच. उगीच सरकारी क्षेत्राला त्यासाठी नावे ठेण्यात अर्थ नाही. फरक असला तर प्रमाणात आहे आणि जर उघडकीला आलेच तर घेण्यात येणाऱ्या कृतीला आहे. खाजगी क्षेत्रातपण चौकशी समिती नेमण्यात येते, सर्व बाजू ऐकून घेण्यात येतात. कृती मात्र ताबडतोब होते. नकळत आम्ही अशाच एका प्रसंगात अडकलो. झाले असे एक प्रसिद्ध ऑटो कंपनीने त्यांचे बरेचसे स्पेअर पार्ट्स बाहेरून करून घेण्याचे ठरविले आणि त्यासाठी कोटेशन्स मागविले.

कोटशन्स ऑन लाईन भरायचे असल्याने बाकी स्पर्धक कोण आहेत याची कल्पना नव्हती. आम्हीपण आमच्या आवाक्यात असलेल्या चार पाच पार्ट्सचे कोटेशन भरले. जेव्हा कोटेशन्स ओपन झाली तेव्हा लक्षात आले की इथे पण लॉबी कार्यरत आहे आणि तीन कंपन्या सोडल्यास बाकी कोणालाही ते काम मिळू देत नाही. त्यातही चांडक इंजिनियरिंग म्हणून जी कंपनी होती ती फार आक्रमक होती. त्यांनी सरळ आमच्याशी संपर्क केला आणि सांगितले की कोटेशन मागे घ्या. राकेशने ताबडतोब उत्तर दिले की मागे घेण्यासाठी भरले नाही. ते पण चिवट होते. त्यांनी सांगितले की तुम्ही माघार घ्या. तुमच्या दिलेल्या किंमतीला तुम्ही तयार करा, आम्ही विकत घेऊ पण इथे आम्हाला कोट करू द्या. त्यावर राकेशने त्यांना नम्रपणे नकार दिला आणि ते चारही पार्ट्स आम्हाला मिळाले. खरे म्हणजे इतरांपेक्षा आमचे अतिरिक्त खर्च कमी असल्याने आम्हाला ते काम मिळाले होते. 2010च्या दरम्यान वीस लाखाची ऑर्डर म्हणजे बरेच मोठे काम होते. चांडक इंजिनियरिंग ही गोष्ट काही विसरायला तयार नव्हते हे आम्हाला ऑर्डर देणाऱ्या सयाजी ऑटोतील बोस नावाच्या अधिकाऱ्याने सांगितली आणि काळजी घेण्यास बजावले. खरे म्हणजे व्यवसायात या गोष्टी घडतच असतात. चांडक इंजिनियरिंग मधील

रामप्रसाद हे पर्चेस ऑफिसर ज्यांच्याकडे हे काम होते ते फारच नाराज असल्याचे ही त्यांनी सांगितले.

हे राकेशने आमच्या मीटिंगमध्ये सांगितले.

"नाराज असेल तर असू दे,"सर्व कळल्यावर मी बेफिकीरीने म्हणालो.

"नाही दिनेश. आपण त्यांची मक्तेदारी मोडली आहे. ते आपल्याला हरप्रकारे त्रास देण्याचा प्रयत्न करतील."

"म्हणजे काय करतील? मी त्या रामप्रसादला एक दोन वेळा भेटलो आहे. मला तर तो माणूस चांगला वाटलं. त्याने माझे अभिनंदन पण केले."

"मग तो काय उघडपणे तुला धमकी देईल का? आता ऑर्डर पूर्ण होईपर्यंत तो काहीही करणार नाही. ऑर्डर पूर्ण झाल्यावर सयाजीतील त्याचे कॉन्टॅक्टस वापरून आपल्याला त्रास देईल. त्याने नक्कीच सयाजीतील काही ऑफिसर्स मॅनेज केले असणार."राकेश म्हणाला,"म्हणून आपण सुरवातीपासून दक्षता घ्यायला पाहिजे."

"त्या कोणत्या?"शारदेने विचारले.

“प्रत्येक गोष्टीचा रेकॉर्ड ठेवून, अगदी मटेरियल टेस्टिंगपासून ते फायनल डिस्पॅचपर्यंत प्रत्येक कृतीचा रेकॉर्ड ठेवा.”राकेशने बजावले.

ठीक आहे असे म्हणून सगळे कामाला लागले. ठरलेल्या तारखेच्या तीन दिवस आधीच पहिला लॉट तयार झाला. डिस्पॅचच्या आधी आम्ही चौघेही परत ऐकदा जमलो. अजून काही करायचे राहिले आहे काय? असे राकेशने विचारताच स्वराने विचारले, “माझी एक शंका आहे.”

“मोकळेपणाने बोल.”राकेश म्हणाला

“आपल्या पार्ट्ससारखे अजून कोणाचे पार्ट्स असले तर ओळखायचे कसे?”स्वरा म्हणाली.

“आपण लॉट चेकिंगला देऊ तेव्हा आपल्याला नंबर, कितीचा लॉट आहे याची रिसीट मिळते.”मी माहिती पुरवली.

“नाही दिनेश, स्वरांचा मुद्दा रास्त आहे. आपल्या पार्ट्सवर अशी काहीतरी विशिष्ट पटकन लक्षात न येणारी खूण केली पाहिजे. त्यामुळे सरमिसळ जरी झाली तरी आपल्याला आपले पार्ट्स ओळखता आले पाहीजे.”राकेशने सांगितले.

झाले, अगदी बारकाईने बघितला तरच लक्षात येइल एक गोल इचिंग मार्क आम्ही प्रत्येक पार्टच्या दोन्ही एण्ड्सला केला. नुसताच केला नाही तर प्रत्येक लॉटचे तसे फोटो पण घेतले.

आमच्या परीने सर्व काळजी घेऊन ठरलेल्या दिवसाच्या तीन दिवस आधीच आम्ही डिस्पॅच पूर्ण केला. मी आणि राकेश लॉट देण्यासाठी गेलो. सयाजीची पद्धत माहिती करून घेणे आणि आमच्या पर्चेस ऑफिसर बोसला भेटणे हा उद्देश होता. लॉट दिल्याचे कळल्यावर बोस खुश झाला. ते साहजिकच होते. एक खात्रीलायक आणि पर्यायी पुरवठादार मिळवण्याचे श्रेय त्याला मिळणार होते.

"काही अडचण उद्भवली तर उद्या तीन वाजेपर्यंत मी तुम्हाला तसा फोन करेन."बोस म्हणाला.

काही अडचण येणार नाही असे आश्वासन देऊन आम्ही दोघे परतलो.

पण दुसऱ्या दिवशी दहा वाजताच बोसचा फोन आला. तो फोनवरच फार घाबरल्यासारखा वाटत होता.

"तुम्ही दोघेही ताबडतोब इथे या. फार मोठा घोळ झाला आहे."तो म्हणाला.

“बोस बाबू, काय झाले ते तर सांगा,”मी म्हणालो.

“फोनवर सांगता येणार नाही. तुम्ही इथे या.”बोस म्हणाला.

मी राकेशला त्याप्रमाणे सांगितले. त्याने शांतपणे मला लॉट संबंधित सर्व कागदपत्रे, फ़ोटो बरोबर घेण्यास सांगितले. गाडी चालवीत असताही तो काही बोलला नाही. फक्त कंपनीत आत जाते वेळी तो मला हळूच म्हणाला ही रामप्रसादची करामत आहे.

आम्हाला स्टोअर्सच्या बाहेरच बोस भेटला. तो फारच अस्वस्थ वाटत होता.

“काय झाले बोस?”राकेशने विचारले.

“सर्व करून सवरून मलाच विचारता?”बोस रागाने म्हणाला, “तुम्ही स्टॅण्डर्ड मटेरियल ऐवजी हलक्या प्रतीचे मटेरियल वापरले आहे. तसा आमच्या मेटलर्जी लॅबचा रिपोर्ट आला आहे.”

क्षणभर काय बोलावे हे आम्हा दोघांनाही सुचले नाही. पण प्रथम सावरला तो राकेश. तो ठामपणे म्हणाला, “हे शक्य नाही.”

“राकेश, आमची लॅब पुण्यातील नंबर वनची लॅब आहे. त्यांच्याकडून चूक अशक्य आहे. तुम्ही आमच्याकडून एक मटेरियल चेक करून घेतले आणि प्रत्यक्षात वापरले मात्र

दुसरेच.''बोस काही थांबायला तयार नव्हता, ''आता तुमचे नाव ब्लॅक लिस्ट मध्ये जाणार त्याच बरोबर माझी नोकरी पण जाणार.''

''यातले काहीही होणार नाही. आमच्यावर विश्वास ठेव. आम्हाला आमची बाजू तरी मांडायची संधी दे.''

यावर बोस थोडा शांत झाला. एव्हाना आम्ही प्लॅन्ट हेडच्या केबिन पाशी आलो होतो. केबिनच्या बाहेरच एक जॉब इन्स्पेक्टर, क्वालिटी हेडचे साहेब सराफ, मेटलर्जी लॅबची दोन माणसे अशी स्वागत समिती आमच्या स्वागतासाठी उभी होती आणि एका ट्रे मध्ये चारही पार्ट्स ठेवले होते.

''बोस, यांना माहिती दिली का सगळी?''क्वालिटी हेड सराफ यांनी विचारले. त्यावर बोसने होकारार्थी मान हलविली.

''मग तुमचे काय म्हणणे आहे?''त्यांनी आम्हाला विचारले.

''ते आम्ही साहेबांना सांगू.''राकेश म्हणाला.

''ठीक आहे. तुमची मर्जी.''ते किंचित रागाने म्हणाले. तेवढ्यात प्लॅन्ट हेड खुराणा बाहेर आले.

सयाजीच्या प्लॅन्ट हेडला आम्ही प्रथमच भेटत होतो. पन्नाशीच्या आसपास वय असेल त्यांचे. गोरापान वर्ण, सडपातळ शरीरयष्टी यावर मात करणारी होती ती भेदक नजर. त्यांनी नजर

रोखुन बोलायला सुरुवात केली तर काय बिशाद समोरचा माणूस खोटे बोलेल. ओळख करून दिल्यावर क्वालिटी हेड सराफ यांनी सर्व प्रकरण विस्ताराने सांगितले. लॅब रिपोर्ट त्यांच्या समोर ठेवला आणि पहिल्याच पदार्पणात असे वागणारे पुरवठादार आपल्याला नकोत असे ठामपणे नमूद केले. त्यांचे बोलणे प्लॅन्ट हेडने शांतपणे ऐकून घेतले आणि आम्हा दोघांनाही उद्देशून ते गंभीर आवाजात म्हणाले, “यावर तुमचे काय म्हणणे आहे?”

“सर, कृपया जे पार्ट्स चेक केले ते आम्हाला बघायला मिळतील काय?”राकेश नम्रपणे म्हणाला.

“राकेश, पार्ट्स बघून काही लॅब रिपोर्ट बदलणार नाही.”सराफ कुत्सिकपणे म्हणाले.

राकेशने उत्तरादाखल फक्त प्लॅन्ट हेडकडे बघितले.

“जरूर बघा आणि तुम्हाला काय वाटते ते मोकळेपणाने बोला.”प्लॅन्ट हेड उदगारले.

राकेशने आणि मी चारही पार्ट्सचे दोन्ही एण्ड्स तपासले कोठेही आम्ही केलेली गोल खूण नव्हती. आम्ही पार्ट्स परत ट्रे मध्ये ठेवले. राकेश खुराणा साहेबांना अतिशय नम्रतेने म्हणाला, “माफ करा सर, पण हे पार्ट्स आमचे नाहीत.”

सराफ चिडून काहीतरी बोलायच्या आत खुराणांनी विचारले कशावरून?

खिशातून सर्व लॉट्सचे काढलेले फोटो राकेशने काढून त्यांना दिले आणि आमच्या प्रत्येक पार्टवर आम्ही केलेली गोल खूण दाखवली.

"अशी खूण या चेक केलेल्या पार्टसवर कोठेही नाही म्हणून हे पार्ट्स आमचे नाहीत."राकेश म्हणाला.

खुराणांनी स्वतः फोटोतील खूण बघितली आणि तशी खूण चेक केलेल्या पार्ट्सवर नाही हे पण ताडून बघितले. नंतर क्वालिटी हेडकडे ते फोटो देत ते म्हणाले, "अर्ध्या तासाच्या आत यांच्या पार्ट्सचा रिपोर्ट माझ्याकडे आला पाहिजे."

आमच्याकडे वळून ते ऐवढेच म्हणाले, "असेच दक्षतेने काम करा त्यामुळे मला पण आमच्या सिस्टीम मध्ये सुधारणा करता येतील. दुसरे म्हणजे पार्ट्सवर काहीतरी खूण करायला पाहिजे असे तुम्हाला का वाटले?"

राकेश त्यांच्या नजरेला नजर देत म्हणाला, "असे काहीतरी आमच्या बाबतीत घडेल अशी आम्हाला आशंका होती म्हणून !"

त्यावर त्यांनी काही न बोलता बोसला दोन वाजता सर्व कागदपत्रे घेऊन भेटायला बोलावले.

अर्ध्या तासात सर्व रिपोर्ट्स आले. आमचे सर्व लॉट्स ओके होते. बोसला तर आता अत्यानंद झाला होता. नंतर आमच्यावर कधीही असा प्रसंग आला नाही आणि हो ते क्वालिटी प्रमुख सराफ नंतर आम्हाला कधीही दिसले नाहीत.

---------------*----------------

## प्रकरण ९

सयाजीतील या अनुभवानंतर आपले स्वतःचे प्रॉडक्ट हवे या विचाराने आम्ही चौघेही पछाडल्या गेलो. अशातच एकदा स्वरा आणि शारदा बिलिंगच्या कामानिमित्त सेन्ट्रल वेअर हाऊस या ठिकाणी गेल्या. त्यांचा प्रमुख व्यवसाय ने-आण आणि वितरण हा होता. तिथे ट्रॉलीजच्या खडखडाटाने बोलणे कठीण जात होते.

"इथे नेहमीच इतका आवाज असतो?"स्वराने विचारले

"आज कमी आहे."तेथील माणसाने सांगितले.

आता शारदाला जर इंटरेस्ट आला. तिने विचारले, "प्लास्टिक किंवा रबर व्हील्स का वापरत नाही?"

"प्लास्टिकचे तुकडे पडतात आणि रबर टिकत नाही."त्यानी थोडक्यात उत्तर दिले आणि तो आपल्या कामाला निघून गेला.

नंतर त्या दोघींनी लहानमोठ्या अशा आठदहा कारखान्याचे सर्वेक्षण केले. सगळीकडे असाच प्रॉब्लेम होता. आम्ही चौघेही एकत्र असतांना त्यांनी हे सर्वेक्षण दाखविले. मला आणि राकेशला हा प्रॉब्लेम नवीन नव्हता.

“ठीक आहे. पण यावर उपाय काय आणि आपण काय करू शकतो?”मी विचारले.

“आपण HDPE ( High density polyethylene)ची व्हील्स तयार करायची.”शारदा म्हणाली.

"माझ्या माहितीनुसार काही ठिकाणी ही व्हील्स वापरात आहेत पण फारसा फरक पडलेला नाही.”राकेश म्हणाला.

“ते ही आमच्या रिपोर्टमध्ये आहे. जे मटेरीयल या व्हील्स करिता वापरण्यात आले आहे ते बाजारात उपलब्ध असलेले जनरल ग्रेडचे HDPE आहे. त्यामुळे त्यांना अपेक्षित परिणाम मिळाला नाही. बहुतेक पुढचा खर्च टाळण्यासाठी त्यांनी नन्तर काहीच केले नाही.”

“मग आपण काय करायचे?"

"या मटेरियलचे वैशिष्ट्य हेच आहे की याच्या संरचना आणि डेन्सीटीत तूम्हाला पाहिजे ते फेरफार करता येतात. म्हणून आपल्या आवश्यकतेनुसार आपण फेरफार करून जर मटेरियल बनवून घेतले तर व्हील्स निश्चित टिकाऊ होतील. व्हील्सशिवाय आपण कंटेनर, खेळणी, दुधासाठी क्रेटस, पण बनवू शकतो. तसेच हे मटेरिअल सहज रिसायकल करता येते त्यामुळे सरकार पण याचा वापर वाढावा म्हणून प्रयत्न करीत आहे.”

शारदाने समारोप केला.

“मला वाटते एकदम एव्हढी मोठी उडी घेण्यापेक्षा सुरवातीला शंभर व्हील्स करून दोन ठिकाणी वापरायला देऊ. त्यांच्या फीडबॅकवर पुढे काय करायचे बघू. तसेच हे काम पूर्ण होईपर्यंत तुम्ही दोघीही दुसरे कोणतेही काम बघू नका.”राकेशने निर्णय दिला.

त्यानंतर त्यांनी इतक्या झपाट्याने काम सुरू केले की ज्याचे नाव ते. सर्वप्रथम त्या मटेरियलचा उत्पादक शोधला. तो फक्त जनरल ग्रेडचे मटेरियल तयार करायचा. असे विशिष्ट मटेरियल बनवून पाहिजे असे सांगणारे बहुधा त्याला प्रथमच कोणी भेटले असावे. त्यामुळे त्यानेपण भरपूर सहकार्य केले. एकदा पाहिजे तसे मटेरियल बनवून झाल्यावर पुढचे काम तुलनेने सोपे होते.

त्याप्रमाणे बारा व्हील्स तयार झाल्यावर त्याची सर्वप्रथम प्रयोगशाळेत चाचणी घेण्यात आली. यात वेगवेगळया गती, वजन तसेच काठिण्य पातळ्या समाविष्ट होत्या. आमचे मि. परफेक्शनिस्ट राकेश यांचे समाधान झाल्यावरच अजून दोनशे व्हील्स तयार केली. शारदाने चाचण्यांकरिता गोडावून आणि गोपाल इंजिनियरिंग यांच्याशी आधीच बोलणी केली होती. त्याप्रमाणे ऐंशी ऐंशी व्हील्स दोन्हीकडे देण्यात आली. दोन्हीकडे आमचे ट्रॉली दुरुस्तीचे काँट्रॅक्ट होते त्यामुळे व्हील्स बदलणे आणि

त्यांचा रेकॉर्ड ठेवणे तसे सोयीचे होते. चाळीस व्हील्स आम्ही फक्त राखीव म्हणून ठेवली होती. या सर्व धामधुमीत आमचे दोन महिने गेले. इतर कामे सुरूच होती. चाचणी करता सर्वानुमते एक महिन्याचा कालावधी ठरवला होता. ज्यादिवशीपासून ते काम सुरू झाले त्यादिवशी आम्ही चौघेही एकत्र जमलो असता आमच्या दोन्ही महिला डायरेक्टर्स जरा तणावात दिसल्याने राकेशने त्यांना कारण विचारले.

“चाचण्यात व्हील्स टिकतील की नाही याची काळजी वाटते.”स्वरा म्हणाली.

“त्यात काळजी करण्यासारखे काय आहे? अगदी मटेरियलपासून ते प्रत्यक्ष वापरापर्यंत आपण प्रत्येक बाब काळजीपूर्वक तपासून बघितली आहे. आता फक्त आपला ग्राहक त्याचे मत देईल तेवढेच.”राकेश म्हणाला.

“तरीपण जरा धाकधूक असतेच.”शारदेने स्वराची बाजू घेतली.

“मग इंजिनियरिंगचा काय उपयोग आहे? उलट मला तर खात्री आहे की हाच आपला प्रमुख उद्योग होईल.”राकेश म्हणाला.

“ते कशावरून?”मी विचारले.

“हे बघ हा सतत लागणारा महत्वाचा घटक आहे. मटेरियल मुव्हमेंट ही सातत्याने चालू असणारी क्रिया आहे. मोठया कंपन्यात तर हे काम बघणारे स्वतंत्र विभाग असतात.”

यावर आम्ही तिघांनी काही प्रतिक्रिया दिली नाही. कळेलच आठ दहा दिवसांत असे आम्हाला वाटले. फक्त आमच्या टीमचे रिपोर्ट यायचे जे समाधानकारक होते. त्यावर एकदा चर्चा झाली. आपल्या रिपोर्टपेक्षा ग्राहक काय म्हणतो याला जास्त महत्त्व आहे यावर आमचे एकमत झाले. असाच महिना गेला पण कोणाचीही मेल आली नाही आणि कोणी फोनपण केला नाही त्यामुळे आम्ही जरा चिंतेत पडलो. तेव्हा राकेशने मला दोन्हीकडून रिपोर्ट आणायला सांगितले. नुसता रिपोर्टच आण, तिथली सेक्रेटरी आणू नको असे तो स्वराकडे बघत म्हणाला. त्यावर दुधका जला.... म्हणत मी बाहेर पडलो. मी प्रथम गेलो ते गोडावूनला. तिथे आमच्या दुरुस्ती करणाऱ्या टीमला भेटलो आणि गेल्या महिन्यात ज्या ट्रॉलीजचे व्हील्स बदलले त्या किती वेळा परत दुरुस्ती करिता आल्या हे तपासले. वीस ट्रॉलीज पैकी दोन, त्याही दुसऱ्याच प्रकारच्या दुरुस्ती साठी आल्या होत्या.

तिथूनच मी सरळ त्यांच्या पर्चेस ऑफिसर कदम यांच्याकडे गेलो. त्यांना पण ट्रायलबद्दल माहिती होती. विशेष पाल्हाळ न

लावता मी त्यांना व्हील्स परत नेण्यासाठी मी आलो आहे हे सांगितले.

“अचानक का परत नेत आहात?”त्यांनी विचारले.

“अचानक कुठे? महिना झाला की. तुमच्याकडून काहीच कळले नाही म्हणजे तुम्हाला नकोत असे दिसते म्हणून नेतो परत.”

त्यांनी फोन करून स्टोअर ऑफिसरला बोलावले. स्टोअर ऑफिसर शर्मा लगेच आले.

“शर्मा जी, यांच्या व्हील्सचा रिपोर्ट अजून दिला नाही?"

“तेच काम करीत होतो.”असे म्हणून त्यांनी खिशातून कागद काढून कदम यांना दिला, “डिटेलमधे पाहिजे असे तर दुपारी पाठवतो.”

शॉप मध्ये काम करणाऱ्या लोकांची हीच बाब मला फार आवडते. जे काही करायचे ते ताबडतोब.

“काही गरज नाही, “कदम म्हणाले, “काही तक्रारी असल्यास अजूनही सांगा.”

“तक्रारी काही नाहीत. आवाज पण बराच कमी झाला आहे. दुरुस्ती पण करावी लागली नाही.”

“हे व्हील्स परत न्यायला आलेत. नेऊ दे का?"

“मिळणार नाहीत. उलट त्या दगडी व्हील्स ऐवजी हीच आणा.”असे म्हणून तो निघून गेला.

‘खरा फीडबॅक’ मी मनाशीच म्हणालो.

कदम साहेबांनी एक सुस्कारा सोडला. माझ्याकडे बघत ते म्हणाले, “तुमची व्हील्स चांगली आहेत हे मला पण ठाऊक आहे. मुख्य प्रश्न आहे तो किंमती चा. आम्ही सध्या वापरत असलेल्या व्हील्स जवळपास याच किंमतीला मिळतात. मग तुमची व्हील्स आम्ही का घ्यावी?"

“ज्यांना प्रत्यक्ष काम करावे लागते ते म्हणतात म्हणून.”मी ठामपणे म्हणालो.

“दिनेश मला पण कोणीतरी विचारणारे आहे. याशिवाय एक तरी असे कारण सांग जे पटण्यासारखे असेल.”

“रीसायकलिंग, आमची सर्व व्हील्स रीसायकलिंग करता येतात.”

“मग रीसायकलिंग केलेल्या व्हील्सची किंमत कमी असायला पाहिजे.”

मला या माणसाबद्दल फारच आदर वाटू लागला. कंपनीचा एक एक रुपया वाचवायला हा धडपडत होता.

“अजून रीसायकलिंगची स्टेज आली नाही. पण जेव्हा येईल तेव्हा तुम्हाला इतरांपेक्षा शंभर रुपये कमी चार्ज करू.”मी थोडा विचार करून म्हणालो.

“ठीक आहे. आपण तश्या स्वरूपाचा वार्षिक करार करू. अधिक तपशील मी तुला मेल करतो. सध्यातरी महिन्याला हजार व्हील्सचा पुरवठा करा. चेंज ओव्हर हळू हळू करू. तोपर्यन्त काही त्रुटी आढळल्यास तूम्ही त्या दूर करण्याची हमी दिली पाहिजे.”

“जरूर. अजून काही?”

“सध्या एवढेच.”कदम हसून म्हणाले, “बाय द वे दिनेश, तू एस्कीमोला पण फ्रिज विकशील.”

ही ऑर्डर आमच्या करीता ग्रीन पास ठरली. हिचा संदर्भ देऊन आम्हाला गोपाल इंजिनियरिंगची अशाच स्वरूपाची ऑर्डर मिळाली. हे काम दुसऱ्या दिवशी मी जेव्हा आमच्या मीटिंगमध्ये सादर केले तेव्हा एकाच जल्लोष झाला.

“आता आपल्याला याकरीता लागणारे मनुष्यबळ, मशिनरी, क्वालिटी टेस्टिंग हे सर्व हळूहळू जमा करायला हवे. ही जागा पण कमी पडेल म्हणून नवीन जागा बघायला सुरवात करु या.”राकेश म्हणाला.

“ही जरा घाई होते असे वाटत नाही का?”स्वरा म्हणाली.

“नाही. अशाच जोमाने जरी काम केले तरी आपल्याला चार वर्षे सेट व्हायला लागतील. पण मला यशाची चाहूल लागत आहे. हेच ते प्रॉडक्ट आहे ज्याची मार्केटला सतत गरज असते. निव्वळ व्हील्स तयार करून भागणार नाही, क्रेटस, कंटेनर, बॅरिकेड्स पण बनवावे लागतील. भागभांडवल जर कमी पडेल तर पैसे उभारावे लागतील. तेंव्हा तयारीला लागा.”असे म्हणत त्याने प्रत्येकाला जबाबदाऱ्या वाटून दिल्या आणि उत्साहाने तो म्हणाला, “आज रात्री नऊ वाजता हॉटेल आमंत्रणमध्ये माझ्यातर्फे पार्टी !"

आमंत्रण हे नाव ऐकताच मी चमकून त्याचकडे बघितले. पण त्याचे लक्ष नव्हते. तो स्वरा आणि शारदाला भावी योजना समजावून सांगण्यात गुंग होता.

-------------------*-------------- --

# प्रकरण १०

रात्री मी आणि स्वरा ठीक नऊ वाजता हॉटेल आमंत्रणला पोचलो. दहा मिनिटात राकेश आणि शारदा पण आले. त्याने माझ्या गाडीजवळ त्याची गाडी लावली आणि आत गेलो. आत बसल्यावर सहज बोलल्यासारखे तो मला म्हणाला, “आपण बरोबर वर्षाने येथे आलो नाही काय?"

"म्हणजे तुझ्या लक्षात आहे तर !”मी म्हणालो.

त्यावर स्वराने काय ते असे विचारले. नंतर राकेशने वर्षा पूर्वी घडलेला प्रसंग सविस्तर सांगितला.

“त्या ज्योतिषाने सांगितलेले सर्व खरे झाले. बघा ना, पाच महिन्यात आमची लग्ने झाली, राठींनी आमचे प्रॉडक्ट बदलले, तुम्ही दोघींनी नवीन प्रॉडक्ट शोधले.”मी म्हणालो.

“हे सर्व योगायोग आहेत. त्याने नसते सांगितले तरी असेच झाले असते.”शारदा म्हणाली.

“इतके योगायोग नसतात. शिवाय तो पोटार्थी नव्हता त्याने आमच्या कडून काहीही घेतले नाही. खरे ठरले तर द्या असे म्हणाला होता.”राकेश म्हणाला.

“अच्छा, म्हणून तू आम्हाला इथे आणले वाटते!"शारदा म्हणाली.

“चांगले जेवायचे सोडून तुम्ही काय हे भूत भविष्य लावले आहे? “मी म्हणालो.

यावर सर्वजण हसले नंतर जेवणे हसतखेळत पार पडली. जेवल्यावर त्या दोघी वॉश घ्यायला गेल्या. चल त्या येईपर्यंत जरा मोकळया हवेत जाऊ असे राकेश म्हणाला म्हणून आम्ही पार्कींग लॉटमध्ये गेलो. गाड्यांजवळ पोचलो तर एक आठ दहा वर्षांचा मुलगा गाडी पुसतांना दिसला. आम्ही जवळ येताच त्यांनी झालेच असे म्हणून शेवटचा हात फिरवला आणि बाजूला उभा राहिला. तो होता काळासावळाच, कपाळावर बुक्का, डोक्यावर पांढरी टोपी पण चुणचुणीत वाटत होता.

“कोण रे तू? इतक्या रात्री का गाड्या पुसतो आणि तुला कोणी आमच्या गाडया पुसायला सांगितले?”राकेशने विचारले.

“मी सावळा, मला कोणी सांगितले नाही पण मी इथल्या गाडया नेहमीच पुसतो. दिवसा इतक्या गाड्या नसतात म्हणून रात्री काम करतो.”तो उत्तरला.

“असे न सांगता काम केले म्हणून तुला कोणी पैसे देतात का?' मी कुतूहलाने विचारले.

“काही लोक देतात, काही देत नाही, काही लक्षात ठेवून कधी तरी नंतर देतात.”तो शांतपणे म्हणाला.

बर, बर ठीक आहे असे म्हणत राकेशने दोनशे रुपये काढले आणि त्याला देत म्हणाला हे आम्हा दोघांचे.

“पावले.”असे आनंदाने म्हणत त्यानी बादलीतले पाणी बाजूच्या वाफ्यात फेकले आणि तेथे बादली ठेवून तो गेटकडे चालू लागला. तो गेटमधून गेला आणि कुठे वळला ठाऊक नाही पण अचानक आम्हा दोघांनाही ' अंतरीचा ज्ञानदिवा मालवू नको रे ' ही त्याची लकेर ऐकू आली.

चमकून आम्ही दोघांनी ऐकमेकांकडे बघितले आणि आम्ही दोघेही गेट बाहेर पळत गेलो. बाहेर दोन्हीकडे बघितले पण रस्ता निर्मनुष्य होता.

काळ कोणाकरिताही थांबत नाही. मग तो आमच्या करिता तरी का थांबेल? आमची कंपनी केवळ सात वर्षातच मिडीयम साईझ कंपनी झाली. सुरुवातीला फक्त वीस कामगार होते ते दोनशेहून अधिक झाले. अर्थात आमचे पाय जमिनीवरच होते. खूप ऑर्डर्स मिळाल्या म्हणून आम्ही कधी आनंद साजरा केला नाही किंवा कमी झाल्या तर रडत बसलो नाही. सगळी प्रगती अगदी

सहज झाली असेही नाही. व्यवसायातले चढ उतार, टक्के टोणपे आम्हाला पण चुकले नाहीत पण आम्ही कधी हार मानली नाही साहजिकच व्यवसायाकडे दुर्लक्ष होऊ नये म्हणून आम्ही एका जनरल मॅनेजरची नेमणूक करण्याचे ठरविले कारण व्याप खरेच तेवढा वाढला होता.

परत वेदपाठक यांना आम्ही आमच्या अपेक्षा कळविल्या. त्यांनी तीन महिन्यांत तुम्हाला एक चांगला जनरल मॅनेजर मिळवून देतो याची हमी दिली आणि आम्ही निश्चिंत झालो. वेदपाठक याची ही अजून एक खासियत होती. ते त्यांच्या उमेदवाराची गॅरंटी घेत अगदी जसे आपण मालाची किंवा वस्तूंची घेतो तशी. आतापर्यंत तरी त्यांची गॅरंटी कधीही फेल गेली नव्हती.

एका महिन्यातच त्यांनी दोन उमेदवार फायनल झाले आहेत असे कळविले आणि त्यांचा CV पाठविला. राकेश नेमका त्यावेळी काही कामानिमित्त परगावी गेला होता. तूच फायनल कर असेही तो म्हणाला. त्याप्रमाणे मी, स्वरा आणि शारदा यांनी मिळून दोघांच्याही मुलाखती घेतल्या. एक नाव निश्चित केले आणि तसे त्याला कळविले. तसे आम्ही वेदपाठक यांना कळविले आणि श्री राघव प्रधान हा आमचा नवीन जनरल मॅनेजर म्हणून रुजू झाला. साधारणपणे एका महिन्यातच राघव इतका रुळला की आम्ही

त्याच्यावर विसंबून राहू लागलो. वेदपाठक यांचे खरेच कसे आभार मानावे हे आम्हाला कळत नव्हते.

बघता बघता इयर एंडिंग आले. नेमाप्रमाणे यावी तशी इन्व्हेंटरी आली. राघवची ही आमच्या इथली पहिलीच इन्व्हेंटरी. तो सर्व समर्थपणे हाताळेल याची आम्हा दोघांनाही खात्री होती. तरीपण निदान सह्या करण्यासाठी तरी आमची उपस्थिती आवश्यक होती. इतर काही काम नसल्याने मी राकेशच्या केबिनमधे गप्पा छाटीत बसलो होतो. असेच पावणे पाच वाजले.

“चल राकेश, निघुया आता. या राघवने तर आपल्याला सह्या करायला देखील बोलावले नाही.”मी गमतीने म्हणालो. तोच केबिनच्या दारावर कोणीतरी टकटक केली.

“येस कम इन”राकेश बसल्या जागेवरूनच म्हणाला.

दार उघडून एक चाळिशीचा इसम आत आला. राकेशने त्याला बसण्याची खूण केली.

“Sorry to disturb you. पण मला आपली फक्त पाच मिनिटे हवी आहेत.”तो बसत म्हणाला.

“माफ करा, मी आपल्याला ओळखले नाही.”राकेश म्हणाला.

“मी सावंत. माझा आपल्याशी तसा प्रत्यक्ष संबंध आला नाही. पण यांच्याशी आला आहे.”तो माझ्याकडे हात दाखवित म्हणाला,”त्यालापण आता महिना होऊन गेला त्यामुळे ते पण विसरले असतील. मी आपल्या कंपनीत जनरल मॅनेजर या पदासाठी अर्ज केला होता.”

“ठिक आहे. आम्ही आमचा निर्णय हेड हंटरला कधीच कळवला आहे. तुम्ही तिथे संपर्क करा.”राकेश तुटकपणे म्हणाला.

मी चमकलो. राकेश कधीही अशा पध्दतीने बोलत नसे.

“मी तिथे चौकशी केली.”सावंत म्हणाले “जागा भरली आहे असे ते म्हणाले. माझी निवड का झाली नाही हे मला कळू शकेल काय?”

“नाही. हे बघा मी तुम्हाला कोणतेही उत्तर द्यायला बांधील नाही कारण तुमचा सर्व व्यवहार हेड हंटरशी झाला आहे. तुम्ही त्यांच्याशी बोला.”राकेश म्हणाला.

“This is unethical. मला या नोकरीची फार गरज आहे. या नोकरीच्या भरवश्यावर मी आधीची नोकरी सोडली आहे.”

“आम्ही सांगितली होती का सोडायला?” राकेश शांतपणे म्हणाला, “आणि या इथिक्सच्या वगैरे गप्पा तुमच्या तोंडी शोभत नाही सावंतसाहेब.”

“म्हणजे?”सावंत चमकून म्हणाले.

“म्हणजे असे की बरोबर सात वर्षांपूर्वी याच तारखेला आणि याच वेळी तुम्ही राकेश देशमुख नांवाच्या इंजिनियरला इनसबऑर्डीनेशनचा खोटा आरोप ठेऊन आगम ऑटो मधून काढले होते तेव्हा तुमचे इथिक्स कुठे गेले होते?”राकेश म्हणाला.


नंतर राकेश उभा राहिला व केबिनच्या दाराकडे गेला. त्याने केबिनचे दार अर्धवट उघडुन धरले आणि तेथूनच तो मोठ्याने ओरडला, “मी तेव्हाच तुम्हाला म्हणालो होतो की याची परतफेड मी एक ना एक दिवस नक्की करेन. तेव्हा मि. सावंत, This way out !!!”


-------***-------


## जगदिश खांदेवाले:

## एक उत्कृष्ट लेखक

जगदिश खांदेवाले यांची ई साहित्यवर प्रकाशित पुस्तके. बाजूच्या कव्हरवर फ़क्त एक क्लिक करताच पुस्तक उघडेल.



# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १३ वे वर्ष.
# जगदिश खांदेवाले यांचे हे चवथे पुस्तक.

जगदिश खांदेवाले यांच्या कथा वास्तवाशी जवळिक साधणाऱ्या, मनोरंजक आणि वैविध्यपूर्ण असतात. ते लिहितात कमी. पण जे लिहितात ते सकस, जोमदार, आणि भरीव असते. त्यामुळे ते वाचकांच्या मनाची पकड घेते. त्यांच्या पुस्तकांवर असंख्य वाचकांचा प्रतिसाद येतो आणि त्यात एक गोष्ट आवर्जून सांगितली जाते. ती म्हणजे "तुमचे पुस्तक हातात घेतल्यावर पुर्ण केल्याखेरिज खाली ठेवता येत नाही". त्यांच्या पुस्तकांना भरपुर मागणी आहे. पण ते अत्यंत मेहनतीने लिहीलेली आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात.

असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर ई साहित्यवर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (२८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(३), अनंत पावसकर(४), मधू

शिरगांवकर (७), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२३), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(१०), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(४) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमुर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।